मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५
पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | शुक्रवार, २१ मार्च २०२५ | वर्ष: ६ | अंक:९२ | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## पेन्शन योजनेची नवीन अधिसूचना जारी

नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी मोठी बातमी आहे. पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटीने गुरुवारी युनिफाइड पेन्शन स्कीम लागू करणारी अधिसूचना जारी केली आहे. या योजनेअंतर्गत, निवृत्तीपूर्वीच्या १२ महिन्यांत मिळालेल्या सरासरी मूळ पगाराच्या ५० टक्के रक्कम निश्चित पेन्शन म्हणून देण्याची तरतूद आहे. ही अधिसूचना राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS) अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारने २४ जानेवारी २०२५ रोजी जारी केलेल्या UPS अधिसूचनेचे अनुसरण करते. यूपीएससी संबंधित नियम १ एप्रिल २०२५ पासून लागू होतील. या नियमांमुळे १ एप्रिल २०२५ रोजी सेवेत असलेल्या विद्यमान केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसह केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना आणि १ एप्रिल २०२५ रोजी किंवा त्यानंतर केंद्र सरकारी सेवेत भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना एनपीएसमध्ये नोंदणी करता येते. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या या सर्व श्रेणींसाठी नोंदणी आणि दाव्याचे फॉर्म १ एप्रिल २०२५ पासून प्रोटीन सीआरए वेबसाइटवर ऑनलाइन उपलब्ध असतील.

अग्रलेख
खरीखरी

## निवडणूक आयोग सुधारला

आपले सध्याचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आल्यानंतर निवडणूक आयोग थोडा माणसाळलेला आहे, असे वाटते. यांच्या आधीचे निवडणूक आयुक्त अज्ञानेश राजीवकुमार नावाचे इसम होते. ज्ञानाशी त्यांचा फारसा संबंध नव्हता. लोकांच्या शंका कुशंकांचे निर्मूलन करण्याची त्यांची तयारी नव्हती. 'मौनम् सर्वार्थसाधनम्' हा त्यांचा बाणा होता. त्यामुळे विरोधकांनी किंवा सामान्य माणसांनी घेतलेल्या कोणत्याही आक्षेपाबाबत स्पष्टीकरण करणे किंवा शंकेचे निराकरण करण्याची त्यांची तयारी नव्हती आणि या गोष्टीची त्यांनी तमा बाळगलीच नव्हती. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत लोकसभेच्या तुलनेने विधानसभेच्या मतदारांची संख्या लक्षणीयरित्या वाढलेली होती. त्यावरून बराचसा वादविवाद झाला होता. पण त्याबद्दल अज्ञानेश असलेले राजीव कुमार चकार शब्द काढायला तयार नव्हते. बोलायला तयार नव्हते. अखेर लोकसभेत विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आयोगाच्या कारभाराबाबत चांगलाच प्रकाश पाडला. महाराष्ट्र प्रमाणेच दिल्लीतही अनेक मतदारांची नावे गाळली गेली आणि नवे मतदार दाखल झाले. या सर्व बाबी निश्चितपणे संशयास्पद आहेत. आता लवकरच बिहार आणि बंगालमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यामुळे त्या त्या राज्यातील निवडणूक कशी पार पडते. याबद्दल शंकाकुशंका व्यक्त होणे स्वाभाविक आहे. मतदार यादींबाबत बराच गोंधळ झालेला आहे. त्यामुळे आयोगाने काही बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने मतदानाची आकडेवारी बूथनिहाय प्रसिद्ध करावी. असे सांगितल्यानंतर निवडणूक आयोगाने, यासाठी अनुकूलता दर्शवलेली आहे. नव्या आयुक्तांच्या आगमनानंतर मतदानाची आकडेवारी बूथ प्रमाणे जाहीर केली जाईल. हे आश्वासन निवडणूक आयोगाने न्यायालयात दिलेले आहे. सुरुवातीपासून किती मतदान झाले आणि शेवटच्या तासामध्ये किती मतदान झाले. याचे आकडे जास्तीत जास्त दोन दिवस म्हणजेच 48 तासात सांगितले गेले तर संशय निर्माण होणार नाही. नवे निवडणूक आयुक्त याबाबत सकारात्मक आहेत. ही त्यातल्या त्यात चांगली बाब आहे. कोणे एकेकाळी टी एन शेषन नावाचे कडक शिस्तीचे निवडणूक आयुक्त होते. त्यांच्या नावाने भल्याभल्यांना कापरे भरत होते असे म्हणतात. त्यांनी त्यावेळी असलेल्या नियमाबरहुकुम कारभार करून अनेक गैरप्रकार थांबवले होते. पण आता गेल्या काही वर्षात निवडणूक आयुक्त चक्क मुका म्हणजे अबोल बनला होता. आता सर्वोच्च न्यायालयाच्या धक्क्यामुळे का होईना, आयोगाने संशय दूर करण्याचा प्रयत्न केला. तर विनाकारण आरोप होणार नाहीत. मतदानाच्या टक्केवारीचे आकडे यापूर्वी लगेच दुसऱ्या दिवशी जाहीर होत असत. आता तर त्यापेक्षाही वेगवान यंत्रणा कार्यरत आहेत. इलेक्ट्रॉनिक मशीन आहेत. मग मतदानाची टक्केवारी जाहीर करण्यात दहा-बारा दिवस वाढण्याचे कारण काय, असा साधा प्रश्न मतदारांच्या मनात आला. तर त्यात नवल ते काय. मतदानाच्या टक्केवारीत पाच सहा टक्क्यांपर्यंत फरक असणे. हे संशय वाढवण्याचे कारण होऊ शकते. एकूणच जनतेच्या मनातील संशय शक्यतो वाढूच नये. असे निवडणूक आयोगाने ठरवले पाहिजे. या दृष्टीने आत्ताचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी घेतलेली भूमिका भले सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्यामुळे घेतलेली असली. तरी ती स्वागतास पात्र आणि योग्यच आहे. निवडणूक आयोगाबद्दलची साशंकता दूर होणे, ही आजची पहिली गरज आहे. ज्ञानेश कुमार यांनी पहिले पाऊल टाकलेले आहे. पुढे काय होईल, ते त्यांनाच ठाऊक असेल.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# दिशा सालियन प्रकरणावरून जोरदार घमासान

## पाच वर्ष बदनामीचा प्रयत्न झाला आहे- आदित्य ठाकरे

गजानन तुपे


मुंबई, दि. २०

दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूत याची माजी मॅनेजर दिशा सालियन यांच्या मृत्यूप्रकरणाने पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा नवे वळण घेतले आहे यामुळे विधानसभेत जोरादर घमासान झाले. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यासह अनेकांवर गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांनंतर आदित्य ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया देत म्हटले आहे, "पाच वर्ष हे चालू आहे. कोर्टात जे होईल ते होईल. मी एकच सांगेल, पाच वर्ष बदनामीचा प्रयत्न झाला आहे. कोर्टात बोलू."



दिशा सालियन यांचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड येथील एका इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. सुरुवातीला पोलिसांनी याला आत्महत्या म्हटले होते आणि दिशाच्या कुटुंबीयांनीही तपासावर समाधान व्यक्त केले होते. मात्र, आता सतीश सालियन यांनी हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेत दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचा खळबळजनक दावा केला आहे. याचिकेत आदित्य ठाकरे, माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यासह इतरांवर आरोप करण्यात आले असून, या प्रकरणाची सीबीआय चौकशी आणि एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणावर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना आदित्य ठाकरे यांनी आपली बाजू मांडली. विधानभवनाबाहेर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, "तुम्हीही या गोष्टीचे साक्षीदार आहात. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने माझी बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे प्रकरण आता कोर्टात आहे, त्यामुळे मी कोर्टातच बोलेन." त्यांनी हे प्रकरण राजकीय षड्यंत्राचा भाग असल्याचा अप्रत्यक्ष इशारा देत आपली लढाई कायम ठेवणार असल्याचेही सूचित केले. सतीश सालियन यांनी याचिकेत दावा केला आहे की, दिशाच्या मृत्यूदिवशी तिच्या घरी एका पार्टीत आदित्य ठाकरे आणि इतर काही व्यक्ती उपस्थित होते. या पार्टीत दिशावर सामूहिक बलात्कार झाला आणि नंतर तिची हत्या करून आत्महत्येचा बनाव तयार करण्यात





आला, असा आरोप आहे. याचिकेत पोस्टमॉर्टम अहवालात छेडछाड, सीसीटीव्ही फुटेज गायब करणे आणि राजकीय दबावातून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा दावाही करण्यात आला आहे. या याचिकेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. भाजप नेते नितेश राणे यांनी यापूर्वीच या प्रकरणात आदित्य ठाकरेंवर आरोप करत अटक आणि चौकशीची मागणी केली होती. आता सतीश सालियन यांच्या याचिकेने हा मुद्दा पुन्हा तापला असून, ठाकरे गटावर दबाव वाढला आहे. दुसरीकडे, ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. "पाच वर्षांनंतर हे प्रकरण पुन्हा काढणे म्हणजे ठाकरे कुटुंबाला बदनाम करण्याचा डाव आहे," असे राऊत यांनी नमूद केले.

या प्रकरणाची सुनावणी लवकरच हायकोर्टात होण्याची शक्यता आहे. सतीश सालियन यांनी सीबीआय चौकशीची मागणी केल्याने न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, आदित्य ठाकरे यांनी कोर्टात आपली बाजू मांडण्याची तयारी दर्शवली असून, या प्रकरणाचा राजकीय वापर होत असल्याचा आरोपही केला आहे. हे प्रकरण आता कायदेशीर आणि राजकीय लढाईचे नवे केंद्र बनले असून, येत्या काळात त्याचे पडसाद राज्यभर उमटण्याची शक्यता आहे.

## विधानभवन परिसरात शिवसेना आमदारांचे मूक आंदोलन

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

शिवसेना आमदारांनी आज विधानभवन परिसरात मूक आंदोलन करून दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची 'सीबीआय'कडून सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. आंदोलनादरम्यान, त्यांनी फलक झळकावत दिशाच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, असे आवाहन केले. शिवसेना आमदार डॉ. मनीषा कायंदे म्हणाल्या की, दिशाच्या वडिलांनी हायकोर्टात धाव घेतली आहे आणि त्यांनी काही व्यक्तींवर संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. त्यांनी असेही नमूद केले की, १४व्या मजल्यावरून पडूनही दिशाच्या शरीरावर कोणतीही जखम नव्हती, जे संशयास्पद आहे. त्यामुळे या प्रकरणातील सर्व आरोपांची चौकशी झाली पाहिजे. शिवसेना आमदारांनी माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे. दिशाच्या वडिलांवर दबाव आणण्याच्या आरोपांची सखोल तपासणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दिशाच्या वडिलांनी पोलिस तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, फॉरेन्सिक तपास योग्य पद्धतीने न झाल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सीबीआयकडून नव्याने चौकशी होणे आवश्यक असल्याचे शिवसेना आमदारांचे मत आहे. आंदोलनादरम्यान, शिवसेना आमदारांनी दिशाच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि सत्य बाहेर यावे, अशी मागणी केली. त्यांनी या प्रकरणाला कोणताही राजकीय रंग न देता निष्पक्ष चौकशीची आवश्यकता व्यक्त केली.

नितेश राणे यांनी या प्रकरणावरून ठाकरे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, "ही फार सोपी आणि सरळ केस आहे. जर ही आत्महत्येचीच घटना होती, तर मग ८ जून २०२० पासून आतापर्यंत इतकी पळापळ का सुरू आहे? लपवालपवी का चालली आहे? आदित्य ठाकरेंना यातून का वाचवावे लागते आहे? जर त्यांचा काहीच संबंध नसेल, तर मग त्यांची एवढी धडपड का दिसते?" त्यांनी पुढे सुप्रीम कोर्टाच्या एका निकालाचा हवाला देत म्हटले, "सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट सांगितले आहे की, बलात्काराचा आरोप असेल, तर सर्वप्रथम त्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करावी. त्याच नियमानुसार, आदित्य ठाकरेंवर केस दाखल करून त्यांना अटक करावी आणि चौकशी करावी. ज्या न्यायाची अपेक्षा इतरांना असते, तोच न्याय ठाकरेंनाही लागू करावा."

## अनिल परब आक्रमक

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यूचे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची एनआयए चौकशी करण्याची मागणी केली आहे. दिशा सालियन प्रकरणावरून राज्यात पुन्हा एकदा राजकीय चर्चा रंगली आहे. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी मंत्री जयकुमार गोरे आणि किरीट सोमय्यांचा दाखला देत जोरदार प्रत्युत्तर दिले. या प्रकरणांची चौकशी का होत नाही? अशी विचारणा त्यांनी केली.

अनिल परब म्हणाले की, किरीट सोमय्याची बायको आत्महत्या करायला चालली होती, जयकुमार गोरेंचे उघडे, नागडे फोटो सभागृहात आले. मात्र, त्याची चौकशी केली जात नाही. विरोधी पक्ष कमजोर आहे म्हणून कसही दाबू नका, असे परब म्हणाले. त्यांनी सांगितले की, कायद्यानं आदित्य ठाकरे यांचं कायद्यानं जे काय व्हायचं ते होईल. आदित्य ठाकरेंची केस किती दिवस चालू आहे. सीबीआय चौकशी सुरु आहे, एसआयटी आहे, सीआयडी चौकशी सुरू आहे.सगळे विषय बाजूला जावे म्हणून हे सुरु आहे का? अशी विचारणा त्यांनी केली. अनिल परब म्हणाले की, मनिषा कायंदे यांचे ट्विट वाचून दाखवतो. सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं. मनिषा कायंदे सरड्यापेक्षा फास्ट रंग बदलला, सरड्याला पण लाज वाटली. जयकुमार गोरे यांच्याबद्दल कोणी बोलत नाही, घ्या ना त्याचा राजीनामा, असे आव्हान त्यांनी दिले. विरोधी पक्ष कमजोर आहे म्हणून काहीही वागायचं, किरीट सोमय्याचा व्हीडिओ दिला होता त्याची चौकशी का नाही केली? अशी विचारणा त्यांनी केली. कामकाजाबद्दल जे विरोधी पक्षनेते बोलले ते बरोबर आहे. सभापती हे सर्व पक्षांचे होतात, असे ते म्हणाले.

## तुम्ही स्वत:ला काय समजता? दानवे - महाजनांमध्ये जुंपली

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून राज्यात वेगवेगळ्या विषयांवरून चांगलंच राजकारण तापलं आहे. औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. यातच नागपूरमध्ये दंगलीची घटना घडली. या घटनेचे पडसाद उमटत आहेत. यातच दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरून सभागृहात देखील मोठा गोंधळ पाहायला मिळाला.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यामध्ये जोरदार बाचाबाची झाल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नाही तर अंबादास दानवे आणि गिरीश महाजन यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अंबादास दानवे हे चांगलेच आक्रमक झाल्याचं पाहायला मिळाले. अंबादास दानवे आणि गिरीश महाजन हे एकमेकांच्या अंगावर धावून जाणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, तेव्हाढ्यात विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सभागृहाचं कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब केले.

अंबादास दानवे सभागृहात बोलताना म्हणाले की, "सभागृहात संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित नाहीत? मग त्यांच्या वेळेनुसार कामकाज चालणार आहे का? सभापती महोदय सभागृहाच्या कामकाजाचा क्रम असतानाही तुम्ही एकाचवेळी चार-चार जणांना बोलण्याची परवानगी देता? आता तुम्हाला (दिशा सालियन मृत्यू प्रकरण) चौकशी करायची तर करा. एसआयटी नेमलेली आहे. काही अडचण नाही. मात्र, एका व्यक्तीच्या विरोधात चार-चार जणांनी बोलायचं का? असा सवाल अंबादास दानवे यांनी केला.

पण तितक्यात मंत्री गिरीश महाजन काहीतरी बोलले. त्यावर अंबादास दानवे चांगलेच भडकले. दानवे म्हणाले की, गिरीशजी मला बोलूद्या प्लिज. मी तुमच्याशी काही बोलत नाही. मी सांगतो की सभापती महोदय मंत्र्यांचा हस्तक्षेप थांबवायला हवा. नेहमी-नेहमी त्यांची मधी बोलण्याची आवश्यकता नाही. ज्या खात्याचा प्रश्न असेल त्यांनी बोलावं. दुसऱ्यांनी मधी बोलू नये. माझं बोलणं सुरु आहे मग मला बोलूद्या. अन्यथा मी बाहेर जातो, त्यांनाच (मंत्री गिरीश महाजन यांना) बोलायला सांगा. त्यांचं हे नेहमीचच झालंय, कोणत्याही विषयांवर ते मध्ये बोलतात", असे म्हणत अंबादास दानवे यांनी संताप व्यक्त केला.

# राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' ज्येष्ठ शिल्पकार राम व्ही. सुतार यांना जाहीर झाला आहे. ही घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली. वयाच्या १००व्या वर्षीही शिल्पकलेत सक्रिय असलेले राम सुतार यांच्या कार्याचा हा गौरव आहे. या घोषणेनंतर विधानसभेत सर्वपक्षीय आमदारांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

राम सुतार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार असून, त्यांनी भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला शिल्पांच्या माध्यमातून अमरत्व बहाल केले आहे. त्यांनी साकारलेली गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' ही सरदार वल्लभभाई पटेल यांची १८२ मीटर उंचीची पुतळा ही जगातील सर्वात उंच पुतळा म्हणून ओळखली जाते. याशिवाय, महात्मा गांधी यांच्या अनेक पुतळ्या,



चंबळ स्मारक, बेंगळुरू विमानतळावरील केम्पेगौडा पुतळा अशा अनेक स्मारकांनी त्यांनी देशभरात आपली छाप सोडली आहे. वयाच्या शंभराव्या वर्षीही ते शिल्पकलेत कार्यरत आहेत, हीच त्यांच्या समर्पणाची खरी ओळख आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "राम सुतार यांनी आपल्या शिल्पकलेतून महाराष्ट्राचा आणि देशाचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या कलाकृती जगभरात भारताचे प्रतिनिधित्व करतात. 'महाराष्ट्र भूषण २०२४' साठी त्यांच्या नावाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे." हा पुरस्कार त्यांना लवकरच एका विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र भूषण पुरस्कारात २५ लाख रुपयांची रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र यांचा समावेश आहे. हा पुरस्कार साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, समाजसेवा आदी क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी दरवर्षी दिला जातो. यंदा शिल्पकलेतील अतुलनीय योगदानासाठी राम सुतार यांची निवड झाली आहे.

या घोषणेनंतर सर्वपक्षीय नेत्यांनी सुतार यांचे अभिनंदन केले. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, "राम सुतार हे महाराष्ट्राचे खरे रत्न आहेत. त्यांचा हा सन्मान म्हणजे आम्हा सर्वांचा गौरव आहे." शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आणि सुतार यांच्या कार्याला "काळाच्या पलीकडचे" असे संबोधले.

१९ फेब्रुवारी १९२५ रोजी धुळे जिल्ह्यातील गोंदूर गावात जन्मलेल्या राम सुतार यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून शिक्षण घेतले. त्यांना १९९९ मध्ये पद्मश्री आणि २०१६ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या निर्मितीने त्यांना जागतिक कीर्ती मिळवून दिली. आजही ते आपल्या स्टुडिओत नव्या शिल्पांवर काम करत आहेत.

महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या माध्यमातून राम सुतार यांच्या शिल्पकलेतील योगदानाचा सन्मान होत असून, हा क्षण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा आहे. त्यांच्या कार्याने प्रेरणा घेऊन नव्या पिढीला कला क्षेत्रात योगदान देण्याची प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता या पुरस्कार प्रदान सोहळ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बस्तर येथे दोन चकमकींमध्ये 22 माओवादी ठार



बस्तर, दि. २० प्रतिनिधी

छत्तीसगडमधील बस्तर भागात गुरुवारी झालेल्या दोन चकमकीत एक जवान आणि २२ माओवादी ठार झाले आहेत. दंतेवाडा सीमेजवळील विजापूर जिल्ह्यातील गंगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात माओवादी असल्याची माहिती मिळाली होती. याआधारे सुरक्षा दलांनी सकाळी ७ वाजता कारवाई सुरू केली तेव्हा पहिली चकमक झाली.

बस्तर रेंजचे आयजीपी सुंदरराज पी यांनी सांगितले की, दांतेवाडाच्या सीमेजवळ बिजापूर जिल्हातील गंगालूर ठाण्याअंतर्गत येणाऱ्या जंगल परिसरात माओवादी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. सुरक्षा दलाच्या शोधमोहिमदरम्यान सकाळी सात वाजता चकमक सुरू झाली. अनेक तास अधूनमधून गोळीबार सुरू होता अशी माहिती आहे.

गोळीबारात विजापूर जिल्हा रिझर्व्ह गार्डचा (डीआरजी) एक जवान शहीद झाला आहे. १८ माओवादी मारले गेले आहेत. आम्ही स्फोटके आणि शस्त्रे जप्त केली आहेत. शोध मोहीम सुरू आहे," असे अधिकाऱ्याने पुढे बोलताना सांगितले.

बस्तर भागातील नारायणपूर आणि कांकेर जिल्ह्यामध्ये दुसऱ्या एका चकमकीत चार माओवाद्यांना ठार करण्यात आले आहे. या भागात माओवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई सुरू करण्यात आली, कांकेर जिल्ह्यातील डीआरजी आणि बीएसएफच्या संयुक्त दलांना मोहिमेसाठी रवाना झाले होते, अशी माहिती असे कांकेर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक आय कल्याण एलेसेला यांनी दिली.

छोटेबेठिया पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या कोरोस्कोडो गावाजवळ ही चकमक झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. गोळीबारात ठार झालेल्या चार माओवाद्यांकडून एक ऑटोमॅटिक रायफल आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान दुसऱ्या एका घटनेत नारायणपूर जिल्ह्यातील अबुझामदच्या जंगलात सुरक्षा दलाकडून कारवाई केली जात असताना पहाटे ३ वाजता काही बंडखोरांनी आयईडी स्फोट घडवून आणला. या स्फोटामुळे एक जवान आणि एका अधिकाऱ्याच्या डोळ्यात धूळ गेली. दोघांनाही बाहेर काढण्यात आले आणि ते सुरक्षित आहेत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. तसेच ही मोहिम अजूनही सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

# सभापती-अध्यक्षांवर पक्षपातीपणाचा आरोप

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी घेतली राज्यपालांची भेट

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यावर पक्षपातीपणाचा आणि नियमबाह्य कामकाजाचा गंभीर आरोप केला आहे. सत्ताधारी महायुती सरकारला साथ देत ही दोन्ही पदाधिकारी विरोधी पक्षांचा आवाज दाबत असून, लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा अवमान करत असल्याचा दावा दानवे यांनी केला. या संदर्भात महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज राजभवनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आणि या प्रकरणी हस्तक्षेपाची मागणी केली.



अंबादास दानवे म्हणाले, "सत्ताधारी पक्षाला साथ देऊन विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सभापती नियमबाह्य पद्धतीने कामकाज करत आहेत. विरोधी पक्षाच्या आमदारांना आपले मत मांडण्यास मर्यादा घातल्या जात आहेत आणि महत्त्वाच्या चर्चांदरम्यान त्यांची अडवणूक केली जाते. ही कामकाजाची पद्धत पूर्णपणे पक्षपाती आहे." त्यांनी सभागृहात विरोधकांना बोलण्याची संधी नाकारली जात असल्याने त्यांचा संवैधानिक हक्क डावलला जात असल्याचेही नमूद केले.

दानवे यांनी पुढे सांगितले की, संसदीय प्रणालीत विरोधी पक्ष हा सरकारवर अंकुश ठेवणारा महत्त्वाचा घटक आहे. "आमची भूमिका सरकारविरोधी नाही, तर सरकारच्या धोरणांवर टीका करणे आणि पर्यायी सूचना मांडणे हे आमचे कर्तव्य आहे. पण सभापती आणि अध्यक्ष संसदीय परंपरांचे पालन न करता एकांगी आणि पक्षपाती भूमिका घेत आहेत," असे त्यांनी ठणकावले. त्यांनी सभागृहात नियमांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करत सभापती आणि अध्यक्षांनी निष्पक्षतेचा अभाव दाखवल्याची टीका केली. विरोधकांनी सभागृहातील कामकाजावर अनेक आक्षेप नोंदवले. दानवे म्हणाले, "पुरवणी मागण्यांच्या चर्चेदरम्यान संबंधित खात्याचे मंत्री किंवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित राहणे बंधनकारक आहे, पण याकडे दुर्लक्ष केले जाते. विरोधी पक्षाच्या कपात सूचनांना सरकारकडून उत्तरे दिली जात नाहीत. सभागृहाच्या अदृश्य गॅलरीत संबंधित खात्याचे सचिवही नसतात. इतकेच नव्हे, तर खात्याशी संबंध नसलेल्या मंत्र्यांना चर्चेला उत्तर देण्याचा अधिकार दिला जातो." या सर्व मुद्द्यांमुळे सभापती आणि अध्यक्षांनी सभागृहाचा विश्वास गमावल्याचा आरोप त्यांनी केला. या सर्व प्रकाराची दखल घ्यावी आणि विरोधी पक्षाच्या हक्कांचे संरक्षण करावे, अशी मागणी करत महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. दानवे म्हणाले, "सभागृहात आम्हाला बायस वागणूक मिळत आहे. आमच्या संवैधानिक हक्कांचे रक्षण व्हावे, यासाठी हा मुद्दा राज्यपालांच्या निदर्शनास आणला आहे. त्यांनी स्वतः लक्ष घालून योग्य निर्णय घ्यावा." या शिष्टमंडळात शिवसेना (उबाठा) गटनेते आदित्य ठाकरे, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जयंत पाटील, नाना पटोले, अनिल परब, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, सुनील राऊत, सचिन अहिर यांच्यासह अनेक आमदार उपस्थित होते. या आरोपांवर महायुतीकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, यापूर्वी भाजप चे प्रवीण दरेकर आणि शिंदे गटाचे उदय सामंत यांनी अशा टीकांना "विरोधकांचा नाटकीपणा" संबोधले होते. दरेकर यांनी म्हटले होते, "सभापती आणि अध्यक्ष नियमांनुसारच काम करत आहेत. विरोधकांकडे ठोस मुद्दे नाहीत, म्हणून ते अशी आंदोलने करतात." या भेटीनंतर महायुतीकडून यावर काय प्रतिक्रिया येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. हा वाद सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर घडला असून, यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमधील तणाव आणखी वाढला आहे. नागपूर हिंसाचार, औरंगजेब वाद आणि दिशा सालियन प्रकरणावरून आधीच सरकारवर दबाव असताना, हा नवीन मुद्दा महायुतीसाठी डोकेदुखी ठरू शकतो. महाविकास आघाडीने राज्यपालांकडे धाव घेऊन हा प्रश्न आता विधानमंडळाबाहेर नेला आहे, ज्यामुळे याचे पडसाद राजकीय वर्तुळात उमटण्याची शक्यता आहे.

# आदित्य ठाकरे अन् रिया चक्रवर्तीचे अनेक वर्षांपासूनचे संबंध - वकील निलेश ओझांचा दावा

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

दिशा सालियान मृत्यू प्रकरणाची पुन्हा चौकशी होणार आहे. दिशाचे वडिल सतीश सालियान यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन सीबीआयकडून चौकशी करण्याची मागणी केली आहे. यावरुन आता राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान, आता दिशा सालियानच्या वकिलांनी मोठा दावा केला आहे. 'आदित्य ठाकरे अन् रिया चक्रवर्तीचे अनेक वर्षापासूनचे संबंध होते,पार्टीच्यावेळी सालियानच्या फ्लॅटवर आदित्य ठाकरे असल्याचे डिजिटल पुरावे मिळाल्याचा दावा वकीलांनी केला.

वकील निलेश ओझा म्हणाले, रिया चक्रवर्ती आणि आदित्य ठाकरे यांचे संबंध खूप जुने आहेत.४४ वेळा यांचे एकमेकांसोबत फोन कॉल झाले आहेत. दिशा सालियान आणि सुशांतसिह राजपूत यांचा मृत्यू झाला तेव्हा या दोघांचे ४४ वेळा कॉल झाले आहेत, असा मोठा दावा वकीलांनी केला आहे.

"दिशा सालियानच्या फ्लॅटवर पार्टी दिवशी आदित्य ठाकरे उपस्थित होते. हे सिद्ध करणारे डिजिटल पुरावे आहेत. मोबाईल टॉवर लोकेशन आणि अन्य पुरावे आहेत. हे पुरावे समीर वानखेडे यांच्याकडे आहेत. आदित्य ठाकरेंसोबत उद्धव ठाकरे, पोलीस अधिकारी हे सुद्धा आरोपी आहेत. या लोकांना कस्टडीमध्ये घ्या. हा तपास उच्च न्यायालयाच्या अख्यारीत करा. मुंबईत निष्पक्ष सुनावणी शक्य नाही. या प्रकरणाची सुनावणी सीबीआयकडे असली पाहिजे, असंही वकील म्हणाले.

# वर्चस्वाच्या वादातून नाशिकमध्ये दोन सख्ख्या भावांची हत्या

नाशिक, दि. २० प्रतिनिधी

नाशिक राष्ट्रवादी अजितदादा गटाचे शहर उपाध्यक्ष उमेश उर्फ मन्ना जाधव आणि त्यांचा सख्खा भाऊ प्रशांत जाधव यांची हत्या करण्यात आली. बुधवारी रात्री टोळक्याने त्यांच्या घरासमोर कोयत्याने सपासप वार करत त्यांचा जीव घेतला. नाशिक पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाच संशयित आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. नाशिक पोलिसांनी २४ तासांच्या आत आरोपींना बेड्या ठोकल्या असून चौकशी करण्यात येत आहे. बुधवारी रात्री दोन भावांच्या हत्येनं नाशिक हादरले होते. नाशिकमधील हे दुहेरी हत्याकांड वर्चस्वाच्या वादातून झाल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर आलेय.

नाशिक पोलिसांच्या तपासात हत्याकांडाचे कारण उघडकीस आले आहे. वर्चस्वाच्या वादातून जाधव बंधूंची हत्या करण्यात आली. आंबेडकरवाडी येथे दोन्ही भावाची हत्या केली होती. उमेश जाधव आणि प्रशांत जाधव या दोन्ही भावांवर धारधार शस्त्राने वार केले होते. उमेश जाधव होता अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा शहर उपाध्यक्ष होते. या प्रकरणी सागर गरड, अनिल रेडकर, सचिन रेडकर, योगेश रोकडे आणि अविनाश उशिरे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर उपनगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला असून चौकशी सुरू आहे.

# राणा डग्गुबती, विजय देवराकोंडासह 25 दाक्षिणात्य कलाकारांवर गुन्हे दाखल

हैदराबाद, दि. २० वृत्तसंस्था

प्रकाश राज, राणा डग्गुबती व विजय देवरकोंडा... दक्षिण सिनेसृष्टीतील हे तीन लोकप्रिय कलाकार आहेत. या अभिनेत्यांनी आजवर त्यांच्या अभिनयानं प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन केलं आहे. मात्र, आपल्या अभिनय आणि भूमिकांमुळे चर्चेत असणारे हे तिन्ही कलाकार आता कायदेशीर कचाट्यात अडकले आहेत. तेलंगणा पोलिसांनी २५ कलाकार आणि काही प्रभावी व्यक्तींविरुद्ध बेकायदा बेटिंग ॲप्सना प्रोत्साहन दिल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे.

त्यामध्ये राणा डग्गुबती, विजय देवरकोंडा, प्रकाश राज, मंचू लक्ष्मी व निधी अग्रवाल यांसारख्या कलाकारांची नावे आहेत. त्यांच्यावर बेटिंग ॲप्सना प्रोत्साहन दिल्याचा आरोप आहे. सायबराबादमधील मियापूर पोलिसांनी ३२ वर्षीय व्यावसायिक फणींद्र शर्मा यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. याचिकाकर्त्याचा असा दावा आहे की, त्यांच्या जाहिरातींमुळे तरुण प्रेक्षकांवर परिणाम झाला आणि वापरकर्त्यांमध्ये आर्थिक संकट निर्माण झाले.

फणींद्र शर्मा यांनी या सेलिब्रिटींवर बेटिंग ॲप्सचा प्रचार करण्याचा आणि जनतेची दिशाभूल करण्याचा आरोप केला होता. या प्रकरणी चौकशी केल्यानंतर सुरेखा वाणी, सुप्रीता, रितू चौधरी व गेटअप श्रीनु यांच्यासह अनेक तेलुगू टीव्ही कलाकारांनी जाहीरपणे माफी मागितली आहे आणि बेटिंग ॲप्सना प्रोत्साहन देण्यात त्यांचा सहभाग असल्याचं मान्य केलं आहे. त्याशिवाय या बेटिंग ॲप्सच्या नकारात्मक परिणामांची माहिती नसल्याचंही कबूल केलं. तेलंगणा गेमिंग कायद्याच्या कलम ३, ३(अ) व ४ आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(ड) अंतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या ॲप्समध्ये केल्या गेलेल्या आर्थिक गुंतवणुकीचा तपास सुरू केला आहे आणि या कथित प्रकरणात कलाकारांचा सहभाग किती आहे याची ते तपासणी करीत आहेत. त्यामुळे आता या प्रकरणी दोषी धरल्या गेलेल्या प्रकाश राज, राणा डग्गुबती व विजय देवरकोंडा या कलाकारांवर काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच, पंजगुट्टा पोलिसांनी किरण गौड, विष्णू प्रिया, श्यामला, इम्रान खान, रितू चौधरी, हर्ष साई, टेस्टी तेजा व बंडारू शेषयानी सुप्रीता यांच्यासह ११ चित्रपट कलाकार आणि सोशल मीडिया इन्फ्ल्यूएन्सर्सवर बेटिंग ॲपचा प्रचार केल्याच्या आरोपाखाली गुन्हे दाखल केले होते. त्यानंतर आता प्रकाश राज, राणा डग्गुबती व विजय देवराकोंडा या कलाकारांवर आरोप ठेवण्यात आले आहेत.



पारंपरिक रहाडीत धप्पा लावताना रंगप्रेमी.

# विविधांगी रंगात रंगले अवघे रंगप्रेमी...



पारंपरिक रहाडीत धप्पे लावण्यासाठी जमलेले रंगप्रेमी आणि मंडळाचे कार्यकर्ते.

# पारंपरिक रहाडी, रेन शावरमध्ये चिंब भिजत रंगपंचमी साजरी

**नाशिक ।** लाल, निळा, हिरवा, पिवळा, जांभळा, गुलाबी, भगवा अन मोरपंखी रंगांची मनसोक्त उधळण करीत अवघे रंगप्रेमी नखशिखांत रंगले. अनेकांनी पारंपरिक रहाडीमध्ये धप्पा मारत स्वतःला रंगात चिंब भिजविले तर अनेकांनी रेन वॉटर शावरचा मनमुराद आनंद लुटला. जागोजागी विविध रंगांनी भरलेल्या टिपातून एकमेकांना रंगचिंब करत अनेकांनी संगीताच्या तालावर मनमुराद ठेका धरला तर अनेकांनी कोरडे रंग वापरत एकमेकांना रंगविले.

रंगपंचमी साजरी करण्यासाठी भली सकाळपासून बच्चेकंपनी घराबाहेर पडली होती तर सकाळी १० वाजेपासूनच युवा वर्ग, तरूणाई रंग उधळत होते. महिला वर्गाचाही सहभाग लक्षणीय होता. सर्ववयीन पुरुष मंडळीही रेन शावर, रेन डान्स, डीजेच्या तालावर थिरकत होती. थोडक्यात अवघा आबालवृद्ध रंगात रंगला होता. जुनी तांबट लेन, तिवंढा चौक, दंडे हनुमान, मधली होळी, कथड्यातील शिवाजी चौक, शनि चौक आदींसह पारंपरिक रहाडीत रंगप्रेमी धप्पे मारताना दिसत होते. यंदा शहरात अनेक ठिकाणी रेन डान्स आयोजित केला होता. रेन शावर लावलेले होते. त्याखाली रंगप्रेमी मनसोक्त चिंब चिंब भिजले. शहरातील अनेक सोसायट्या, अपार्टमेंट,ऊ नागरी वसाहतीमध्ये सामूहिक रंगपंचमी साजरी करण्यात आली. संगीताच्या तालावर मराठी-हिंदी गीतांच्या कवनांवर बेधुंद होत आबालवृद्ध थिरकत होते.

जुने नाशिक परिसरात पारंपरिक रहाडीत धप्पा लावण्यासाठी तर रेन डान्स करण्यासाठी रंगप्रेमी दुचाकीवरून फिरत होते. शहरात सिडको, सातपूर, नाशिकरोड, गंगापूर रोड, शरणपूर रोड, मखमलाबाद, म्हसरूळ, पंचवटी, अशोका मार्ग, अंबड आदींसह ठिकठिकाणी यंदा रंगपंचमीचा जणू महाउत्सव साजरा करण्यात आला. सायंकाळी 4 नंतर मात्र गोदावरी घाटावर प्रचंड गर्दी उसळली होती. रंग खेळून आल्यावर रंगप्रेमी गोदाजलात मनसोक्त डुंबले. रहाडीच्या परिसरात तसेच रेन शावर आणि गोदघाट परिसरात रंगप्रेमींच्या तूटलेल्या, हरवलेल्या, निसटलेल्या चपला-बुटांचा खच पडलेला होता. अतिउत्साही तरुण तर चक्क अंगातील शर्ट काढून उघडे फिरत होते.

रंगोत्सव दरम्यान काही अप्रिय, अनुचित घटना घडू नये म्हणून पोलिसांनी बंदोबदत आवळला होता. भल्या सकाळपासून सुरू झालेला हा रंगोत्सव रात्रीपर्यंत सुरू होता. यंदा गृहिणींचाही उत्साह वाखाणण्याजोगा होता.



रहाडीत डुंबण्यासाठी झालेली रंगप्रेमींची अफाट गर्दी.



ठिकठिकाणी अशा पध्दतीने रंगपंचमी साजरी करताना तरुणाई



संगीताच्या तालावर रंग उडवत थिरकनारा महिला रंगप्रेमी वर्ग



एकमेकांना पाण्याच्या फवाऱ्याने भिजविणाऱ्या युवती.





रेन शावरखाली भिजणारी अन रेन डान्सवर थिरकणारी तरुणाई.

(सर्व छायाचित्रे : सोज्वळ साळी)

## ➤ महत्त्वाचे

### ट्रक टर्मिनस उभारण्याची खा. वाजेंची संसदेत मागणी



**नाशिक ।** आगामी येऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने नाशिकला जलद गतीने ट्रक टर्मिनल उभारावे, अशी मागणी खासदार राजभाऊ वाजे यांनी संसदेत केली. नाशिक लॉजिस्टिक हब व्हावे यासाठी ट्रक टर्मिनल उभारणे गरजेचे असल्याचे खासदार वाजे यांनी म्हटले आहे. नाशिक शहर भौगोलिक दृष्ट्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून झपाट्याने वाढणाऱ्या पायाभूत सुविधा आणि विविध रस्ते निर्मिती आदींमुळे नाशिक अधिक महत्त्वाचे केंद्र बनत आहे. आगामी काळात वाहतूक कोंडी ही भीषण समस्या निर्माण होणार आहे त्याच्या झळा आत्तापासूनच बसायला सुरुवात झाली आहे. ही समस्या आटोक्यात आणण्यासाठी ट्रक टर्मिनल हे मोठे साधन ठरणार असल्याचे नमूद करीत खासदार वाजे यांनी संसदेच्या उन्हाळी अधिवेशनात शहराच्या बाह्यभागात ट्रक टर्मिनल उभारण्याची मागणी केली. ट्रक टर्मिनल झाल्यास त्या माध्यमातून नाशिकमधील कांदा, द्राक्ष, डाळिंब आदींसह इतर कृषी उत्पादनांच्या निर्यातीसाठी सहज माध्यम उपलब्ध होणार आहे. उद्योगांना देखील आपला माल निर्यात करण्यासाठी तसेच कच्चा माल आयातीसाठी ट्रक टर्मिनल उपयुक्त ठरणार असल्याचे खा. वाजे यांनी म्हटले आहे.

### जिल्हाभर साजरा होणार रामोत्सव; विहिपचा निर्धार

**नाशिक ।** जिल्हाभरातील छोटी, मोठी गावे व शहरात सर्वत्र रामोत्सव साजरा करण्याचा निर्धार विश्व हिंदू परिषदेच्या विभागीय अभ्यास वर्गात करण्यात आला. गुढीपाडव्यापासून ते रामनवमीपर्यंत हा सोहळा होणार आहे. नाशिकच्या रुंगठा हायस्कूलच्या सभागृहात रविवारी (दि.१६) संयुक्त महामंत्री स्थानूमलायन यांच्या प्रमुख उपस्थितीत विश्व हिंदू परिषद अभ्यास वर्ग झाला. प्रारंभी श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्यासपीठावर विभागमंत्री अनिल चांदवडकर, पश्चिम महाराष्ट्र महामंत्री नितीन वटकर उपस्थित होते. अनिल चांदवडकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. विजय देशपांडे, विधि प्रोकोष्ठचे शैलेश भावसार, प्रांत कार्यकारिणी सदस्य हेरंब गोविलकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अनिरुद्ध तथा अण्णा पंडित, नाशिक शहर जिल्हाध्यक्ष विराज लोमटे, जिल्हा ग्रामीणचे बाळासाहेब देशपांडे, उपाध्यक्ष द्वारका प्रसाद तिवारी आदी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी विराज लोमटे यांनी धर्मरक्षा निधी म्हणून एक लाख रुपयांचा धनादेश स्थानुमलायन यांच्या हस्ते कोषाध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांच्याकडे सुपूर्द केला. प्रमुख मार्गदर्शक स्थानुमलायन यांनी विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेपासून अयोध्येतील राममूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेपर्यंत आढावा घेतला. विविध धर्मांचे आक्रमण होऊ नये म्हणून समित्या स्थापन करून लोकांमध्ये जावे धर्म व देश विघातक शक्तींना आळा घालावा, असे त्यांनी सुचवले.

### बी. टी. पाटील यांची एसीबी मार्फत चौकशीची मागणी

**नाशिक ।** महापालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी बी. टी. पाटील यांच्यासह शिक्षण उपसंचालक बी. बी. चव्हाण व पाटील यांनी नियुक्त केलेल्या केंद्रप्रमुखांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माध्यमातून चौकशी करावी. तसेच बेनामी संपत्ती प्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र शिक्षक शिक्षक केंद्र परिषदेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मनपाच्या शिक्षण विभागाच्या मूळ आस्थापनेवर शिक्षक कर्मचारी अतिरिक्त ठरत असताना बिंदू नामावलीकडे दुर्लक्ष करत पाटील यांनी जिल्हा परिषद तसेच इतर आस्थापनातील 52 शिक्षकांचे मनपा शाळांमध्ये बेकायदेशीररित्या समायोजन केलाचा प्रकार समोर आला आहे. हे समायोजन करताना पाटील यांनी शासनाची परवानगी घेतली नाही. तसे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची पदे मंजूर नसताना त्यावर बेकायदेशीररित्या काही उपशिक्षक व मुख्यध्यापकांना पदोन्नती दिली आहे. या प्रकारातून बी टी पाटील यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप संघटनेने करत शहरात तसेच जिल्ह्यात इतर ठिकाणी या पैशातून त्यांनी मालमत्ता घेतल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे पाटील यांच्यासह तसेच त्यांच्या गैरकारभाराकडे दुर्लक्ष करणारे शिक्षण उपसंचालक चव्हाण यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

### धूम स्टाईल दुचाकीस्वारांना पोलिसांनी दाखवला हिसका

**नाशिक ।** गंगापूर गावाजवळ धूम स्टाईल भरता मोटरसायकल चालवून इतर वाहन चालकांना कट मारत त्यांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या दहा ते बारा मोटर सायकल स्वारांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गोदावरी नगर येथे रस्त्यावर दिनांक १५ मार्च रोजी राहील उर्फ आसिफ नुरुद्दीन सय्यद राहणार शिवाजीनगर प्रशांत उर्फ बाल्या किशोर गुरु वय १९ रा. गोदावरी हाइट्स निगळ पार्क अब्दुल बरकत अली अन्सारी वय २० राहणार शिवाजीनगर सौरभ राजेंद्र जाधव वय २१ राहणार भवरमळा प्रफुल्ल गणेश देवरे वय १९ राहणार शिवाजीनगर आणि इतर आठ जण रस्त्यात दुचाकी वर मुद्दामहून इतर दुचाकीस्वार व वाहन चालकांना अडथळा निर्माण होईल अशी धूम स्टाईलने एकत्रित रित्या वाहने चालवीत कट मारीत होते याप्रकरणी प्रशांत उर्फ बाल्या किशोर बरु यास पोलिसांनी अटक केली आहे.

# शहरात खुनाची मालिका सुरूच!

## दोघा सख्ख्या भावांच्या हत्येने शहर हादरले

### कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह । आरोपी जेरबंद






**नाशिक ।** शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाले असून गुन्हेगारांकडून राजरोसपणे मुडदे पाडले जात असल्याने शहरातील पोलीस यंत्रणा कुचकामी ठरली आहे. रंगपंचमीच्या दिवशी रात्रीच्या सुमारास पुणेरोडवरील आंबेडकरवाडी परिसरात सख्ख्या दोन भावांची अत्यंत निर्घुणपणे हत्या करण्यात आली.या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून पोलीस यंत्रणेचा गुन्हेगारांवरील धाक कमी झाल्यानेच शहरात खुनाची मालिका सुरू असल्याचे बोलले जाते. उमेश भगवान जाधव (३२) आणि प्रशांत भगवान जाधव (३०)अशी हत्या झालेल्या भावांची नावे असून हत्या करून आरोपी फरार झाले होते मात्र अवघ्या सहा तासातच पोलिसांनी त्यांना जेरबंद केले.

नाशिक शहरात गुन्हेगारीचे स्वरूप दिवसेंदिवस उग्र होत चालले आहे. सातत्याने वाढत चाललेल्या गुन्हेगारीमुळे पोलीस यंत्रणा सपशेल अपयशी ठरत आहे.शहरातील कुख्यात गुन्हेगारांना काही राजकीय पक्षांचा आश्रय मिळत असल्याने राजाश्रयाला असलेले अनेक गुन्हेगार पोलिसांच्या नाकावर टिचून शहरात वावरत आहेत.हद्दपार झालेले गुन्हेगार देखील राजरोसपणे शहरात वावरताना दिसून येतात. पोलिसांचा धाक नसल्यानेच गुन्हेगारांची हिंमत वाढली आहे. शहर आयुक्तालय हद्दीतील काही मोजके अधिकारी सोडले तर बाकीच्या अधिकाऱ्यांची कार्यपद्धती गुन्हेगारांना पोषक ठरणारी आहे. त्यामुळे शहरातील गुन्हेगारीने डोके वर काढले असून शहर गुन्हेगारांच्या विळख्यात सापडले आहे.

उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आंबेडकर नगर परिसरात उमेश भगवान जाधव आणि प्रशांत भगवान जाधव या दोघा सख्या भावांची संशयित सागर गरड, अनिल रेडकर,सचिन रेडकर,योगेश रोकडे,अविनाश उर्फ सोनू उशिरे रा. सर्व आंबेडकरवाडी नाशिक रोड यांनी जुन्या भांडणाची कुरापत काढत आपली दादागिरी कायम राहावी या उद्देशाने बुधवारी रंगपंचमीच्या रात्री साडेनऊच्या सुमारास धारधार शस्त्राने निर्घुण हत्या केली. या घटनेने परिसरात एकच कळली असून हत्या करून हल्लेखोर फरार झाले मात्र पोलिसांनी अवघ्या काही तासातच त्यांना जर बंद केले.

या घटनेची माहिती मिळतात परिमंडळ दोनच्या उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बारी, उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, गुन्हे शाखा युनिट एकचे पोलीस निरीक्षक मधुकर कड, युनिट दोनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले/

घटनास्थळाचा पंचनामा करून दोघा भावांचे मृतदेह उत्तरीय तपासणी साठी जिल्हा रुग्णाला दाखल करण्यात आले.या प्रकरणात फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.शहरातील वाढत्या गुन्हेगारी मुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

> सध्या बीडप्रमाणे नाशिक शहराची परिस्थिती होती की काय अशी भीती व्यक्त केली जात आहे. शहरातील काही उच्चपदस्थ राजकीय नेत्यांनी गुन्हेगारांना आश्रय दिला आहे.शहरातीलच नव्हे तर बाहेरील नामचीन गुन्हेगार देखील राजकीय पक्षांच्या आश्रयाला आहेत.राजाश्रय मिळालेले अनेक कुख्यात गुंड हे राजकीय पक्षांच्या दुसऱ्या फळीत कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या राजकीय गुंडांनी आपल्या टोळीत अनेक छोट्या-मोठ्या गुन्हेगारांना पाळले आहे. त्यामुळे या पाळलेल्या गुंडांनी शहरातील गुन्हेगारी वाढवली आहे. राजकीय पक्षातील दादा, भाऊंनी पाळलेल्या गुन्हेगारांकडून कायमच पोस्टरबाजी केली जाते परंतु पोलीस यंत्रणेचे याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याने गुन्हेगारांना आपले हात पाय पसरवणे सहज शक्य होत आहे. त्यामुळे नाशिकचे बीड होते की काय अशी भीती सध्या व्यक्त केली जात आहे.

## बापलेकांची भेट पहिली आणि शेवटचीच

**नाशिक ।** भारतीय सैन्य दलामध्ये सेवा बजावताना वीर मरण आलेले सुनील विठ्ठल गुजरवर अंत्यसंस्कार झाले. भारतीय सैन्य दल, पोलीस दलाने बंदुकीच्या फैरी झाडून त्याला मानवंदना दिली. यावेळी गहिवरून टाकणारे चित्र होते ते सुनील गुजर हा सरणावर चिरनिद्रिस्त अवस्थेत असताना अवघा सहा महिने वयाचा मुलगा रियांशने घेतलेली आपल्या बाबाची भेट.

सहा महिन्यापूर्वी अरुणाचल प्रदेश मध्ये सेवा बजावत असताना सुनील गुजरला बातमी कळली की, त्याला मुलगा झालाय. केवढा खुश झाला होता तो … कधी एकदा गावी जातोय आणि आपल्या बाळाला घट्ट मिठीत घेतोय असे त्याला झाले होते. परंतु देश सेवा बजावत असताना माया, आपुलकी, प्रेम बाजूला ठेवून त्याला आपले कर्तव्य बजावणे महत्त्वाचे वाटत होते. आपल्या बाळाला केवळ व्हाट्सअप वरून केलेल्या व्हिडिओ कॉल वर बघताना बाळा लवकरच तुला भेटायला येतोय असेच जणू तो सांगत होता. गावाकडे येण्यासाठी त्यांनी दीर्घकालीन रजा ही मंजूर करून घेतली होती, बाळाला भेटण्यापूर्वी त्याला हवा नको ती घेण्याची चर्चाही त्यांनी पत्नी बरोबर केली होती. गावाकडे दीर्घकालीन रजा घेऊन बाळा बरोबर मनसोक्त खेळायचं वेळ घालवायचा असंच त्यांना ठरवलं होतं … परंतु नीयतीच्या मनात काही वेगळेच होत.



गावच्या स्मशानभूमीत सुनीलची आणि त्याच्या बाळाची भेट झाली… येथे चिमुकले बाळ तुला त्याच्या कवेत बसून आपल्या हाताने बाबाला स्पर्श करत होते आणि समोर चितेवर सुनील चिरनिद्रा घेत होता. बाळ बाबाकडे बघत होतं, परंतु सुनीलला आपल्या बाळाला अंगा खांद्यावर खेळवता आले नाही, त्याला कुशीत घेता आलं नाही, त्याची गोड गोड पप्पी घेता आली नाही. त्याचे लाड कौतुक करता आलं नाही. सुनील आपल्या बाळाला भेटला तो थेट चितेवरच. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत सुनीलवर शित्तूर मलकापूर गावच्या मैदानात अंत्यसंस्कार झाले. यावेळी सुनीलच्या अन्य नातेवाईकासोबतच त्याच्या केवळ सहा महिने वयाच्या बाळाने त्याचे अंत्यदर्शन घेतले. बाबाच्या चेहऱ्याला पहिला आणि शेवटचा हात लावला. बापलेकांचा एकमेकांना स्पर्श झाला, परंतु बाप निस्तेज असताना. रियांशला बाबा पहिल्यांदाच भेटला, परंतु पुन्हा कधीही न भेटण्यासाठी पहिला आणि शेवटचाच. सन २०१९ मध्ये भारतीय सैन्य दलात भरती झाले होते. पुणे येथे बॉम्बे इंजिनीयरिंग ग्रुपमध्ये प्रशिक्षण पूर्ण करून मणिपूर येथे बॉम्बे इंजीनियरिंग रेजिमेंटमध्ये सेवा बजावत होते. मणिपूर येथे भूस्खलन झाल्यानंतर रस्ता बनवत असताना सैन्यदलाचे वाहन ८०० फूट खोल दरीत कोसळल्याने अपघात होऊन त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, सहा महिन्यांचा मुलगा, भाऊ असा परिवार आहे.

## नांदगाव मतदारसंघाकरिता २७ प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी

### आ. सुहास कांदे यांच्या पाठपुराव्याला यश

- २५ उपकेंद्रे तर २ प्राथमिक आरोग्य केंद्र
- पंधरावा वित्त आयोगातून निधी मंजूर



**नांदगाव ।** नांदगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांकरिता आरोग्य सुविधा पुरविण्यात बाबत सतत प्रयत्न करत असताना ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अजून सक्षम होण्यासाठी राज्य सरकारकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे पंधराव्या वित्त आयोगातून २५ आरोग्य उपकेंद्रे तसेच दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जवळपास १८.४५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

लवकरच कामे पूर्णत्वास जातील आणि सर्वसामान्य जनतेला अधिक चांगली आरोग्य सेवा व सुविधा मिळेल, असे प्रतिपादन आमदार सुहास कांदे यांनी केले. ग्रामीण भागातील नागरिकांकरिता शासकीय आरोग्य सेवेचा मोठा आधार असतो या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडे उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रांकरिता निधी मिळावा म्हणून कांदे यांनी पाठपुरावा केला होता. या माध्यमातून नांदगाव विधानसभा मतदारसंघात एकूण २५ उपकेंद्रे व दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांना मोठा निधी मंजूर झालेला आहे. यामुळे मतदारसंघातील ग्रामीण भागात आरोग्य सेवा अधिक दर्जेदार होईल व नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

मालेगाव तालुक्यातील गावे- गिगाव जळगाव नि, सावकारवाडी, सोनज, घोडेगाव, चिंचगव्हाण, जातपाडे, येसगाव, जेऊर व दहिवाळ गावांचा समावेश आहे. तसेच नांदगाव तालुक्यातील उपकेंद्रांमध्ये बोलठाण, कासारी, जातेगाव, परधाडी, साकोरा, तळवाडे, पोखरी, बानगाव, कोंढार, मांडवड, वंजारवाडी, वडाळी, हिसवळ खुर्द, वेळा पिंपरखेड व प्राथमिक आरोग्य केंद्रांकरिता बोलठाण व हिसवळ गावांचा समावेश आहे.

## माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा मेळावा संपन्न

### माहिती आयुक्तांच्या मनमानीचा आरोप

**नाशिक ।** नाशिक येथील राज्य माहिती आयुक्त मनमानी पद्धतीने कार्य करतात. कार्यालयातील उपसचिव अर्जदारांना उडवाउडवीची उत्तरे देतात. या कार्यालयात एका दिवसात जवळपास 200 पेक्षा जास्त सुनावण्या घेऊन अर्जदारांची बोलवणी केली जाते. अर्जदारांना झालेल्या सुनावणीचे वर्षभर निकाल मिळत नाही, असा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या मेळाव्यात करण्यात आला.

ही स्थिती कायम राहिल्यास उपोषणाचे हत्यार उपसावे लागेल, असा इशाराही यावेळी मेळाव्यात देण्यात आला. त्या मेळाव्यास माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर, ज्येष्ठ आरटीआय कार्यकर्ते राहुल भारती, महाराष्ट्र उपाध्यक्ष शंकर वडवले, राज्य कार्यकारणी सदस्य साहेबराव वाघ, उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष महेश पाटील, अभिषेक बसवेकर, ठाणे जिल्हाध्यक्ष अशोक पडवळ, धुळे जिल्हाध्यक्ष पूनम चंद्रमोरे, नाशिक जिल्हाध्यक्ष सुभाष दराडे, इगतपुरी तालुकाध्यक्ष किरण धुमाळ, नागेश मोरे, पंढरीनाथ कंनोर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना बसवेकर म्हणाले, आपण समाजातील तळागाळातील घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असतो; परंतु माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, प्रशासनातील मुजोरी, माहिती नाकारण्याची वाढती प्रवृत्ती यामुळे जनतेला व कार्यकर्त्यांना सहजासहजी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. महासंघातील प्रत्येक कार्यकर्ता प्रशिक्षित असला पाहिजे. त्याला माहिती अधिकार कायद्याच्या सखोल ज्ञान असले पाहिजे. कुठल्याही सरकारी, निम सरकारी कार्यालयातून माहिती घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे परिपूर्ण अर्ज कसा करावा, त्यांनी माहिती न दिल्यास वा नाकारण्यास प्रथम अपील व द्वितीय अपिलात जाऊन पाठपुरावा कसा करावा याविषयी त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी अनेकांनी मनोगत व्यक्त केले.

## १०५ वर्षांच्या इतिहासात नाशिक पाटबंधारे विभागाला लाभली पहिली महिला कार्यकारी अभियंता

### इंजि. सोनल शाहाणे यांचा जल व्यवस्थापनात अद्वितीय ठसा

**नाशिक ।** नाशिक जिल्ह्यातील जलव्यवस्थापन आणि पाटबंधारे प्रकल्पांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात असताना, या ऐतिहासिक घडामोडींमध्ये एक विशेष उल्लेखनीय घटना म्हणजे १०५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एका महिलेला कार्यकारी अभियंता म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. इंजि. सोनल शाहाणे या नाशिक पाटबंधारे विभागाच्या पहिल्या महिला कार्यकारी अभियंता बनल्या आहेत. त्यांच्या दूरदृष्टीच्या नियोजनामुळे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जलव्यवस्थापनात लक्षणीय बदल होत आहेत. त्यांनी आपल्या कार्यकुशलतेने जलव्यवस्थापनात क्रांतिकारी बदल करून टाकले. गोदावरी नदीवरील जलसंधारण प्रकल्प आणि पाटबंधारे योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यांनी नवे तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून जिल्ह्यातील जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे धरणे, बंधारे आणि जलस्त्रोतांच्या व्यवस्थापनासाठी पहिल्यांदाच



आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे.

त्यांच्या नेतृत्वाखालील काही मुख्य कार्ये आज चर्चेत आहे. धरणांमधील गाळ काढण्याची महत्त्वाकांक्षी योजना आखल्याने जलसाठ्याची क्षमता वाढणार आहे. गोदावरी नदीच्या प्रवाहात सातत्य राखण्यासाठी विशेष नियोजन, जे भविष्यात पाणीटंचाई रोखण्यास मदत करणार आहे. नाशिक जिल्ह्यातील विविध लहान-मोठ्या जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन, ज्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत राहील. तसे पाहील्यास महिलांच्या नेतृत्वाची ही ऐतिहासिक कामगिरी ठरते. नाशिकच्या पाटबंधारे विभागाच्या १०५ वर्षांच्या प्रदीर्घ इतिहासात प्रथमच एका महिलेला कार्यकारी अभियंता म्हणून संधी



मिळाली आहे आणि ती जबाबदारी अतिशय प्रभावीपणे पार पाडत असल्याचे दिसून येत आहे. शाहाणे यांनी जलव्यवस्थापनासह महिला सक्षमीकरणाचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे पाटबंधारे विभागात महिलांची उपस्थिती आणि नेतृत्व सक्षम करण्यास मोठी प्रेरणा मिळाली आहे. जलसंपत्ती व्यवस्थापन हे केवळ पुरुषप्रधान क्षेत्र राहिले आहे, परंतु त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे या संकल्पनेत बदल घडतो आहे. त्यांनी जलसंवर्धन आणि भविष्यातील अनेक योजनांचा अभ्यास केल्याचे जाणवते आहे. या ऐतिहासिक टप्प्यावर त्यांच्या पुढाकाराने १० मोठी धरणे, ३४ मध्यम पाटबंधारे प्रकल्प आणि गोदावरी नदीवरील १० बंधारे उभारण्याचे नियोजन सुरू करण्यात आले आहे. या योजनांमधून एकूण १०,६८,८६२ लिटर पाण्याचा साठा निर्माण केला जाणार आहे, ज्यामुळे भविष्यातील जलसंकट टाळता येईल. महिला असूनही त्यांनी नेतृत्वाची नवी दिशा दाखविली आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे पाटबंधारे विभागात महिलांसाठी नवा मार्ग तयार झाला आहे. जलव्यवस्थापनासारख्या तांत्रिक क्षेत्रात महिलाही मोठी भूमिका बजावू शकतात, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. १०५ वर्षांच्या इतिहासातील पहिली महिला कार्यकारी अभियंता म्हणून त्यांनी नाशिकच्या पाटबंधारे विभागात सुवर्णाक्षरात लिहिण्यासारखी नवी परंपरा निर्माण केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जलस्त्रोतांचे प्रभावी व्यवस्थापन आणि जलसंवर्धनाच्या अत्याधुनिक उपाययोजना राबवल्या जात आहेत. महिला नेतृत्वाचा हा ऐतिहासिक टप्पा केवळ पाटबंधारे विभागापुरता मर्यादित न राहता संपूर्ण जलव्यवस्थापन क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# अखेर तन्मय, चिन्मय स्टडीत!
# इळ्या, बाळ्या कस्टडीत!!




नागपूरमध्ये दंगल उसळली आणि राज्यकर्त्यांचा हेतू सफल झाला. त्यांना ज्या विषयावर जनमत आपल्या बाजूला वळू शकते, त्या विषयाला खतपाणी घालून त्यांचे मिशन यशस्वी झाले. पण देशातील तरुणांच्या आयुष्याची माती होते त्याचे कथित हिंदुत्ववाद्यांना काय घेणे घेणे? धर्म रक्षण करणे म्हणजे ज्याच्याजवळ देशाचा उद्योग, पैसा, देशाचा व्यापार, देशाचं राजकारण, सत्ता आहे त्याच काम आहे. आपल्याजवळ साधी उपजिविकेची नोकरी नाही. प्रत्येक गोष्टीत हाल आणि दरिद्री त्रास आहे. म्हणून एव्हढ मोठ काम आपलं नाही. आजपर्यंत जेंव्हा जेंव्हा एका विशिष्ट विचाराने हिंदू-मुस्लिम दंगली घडवल्या, त्यावेळी हिंदू समाजाच्या वतीने नेहमी मराठा तसेच बहुजन समाजातील तरुणांनी अधिक सहभाग घेऊन आपले आयुष्य बरबाद केले आहे. सध्या औरंगजेबाच्या कबरीवरून वाद पेटवणाऱ्या बजरंग दल, विश्वहिंदू परीषद व पतित पावन संघ या तिन्ही संघटना व नारायण राणे यांचे मंत्री असलेले पुत्र व कट्टर (?) नवहिंदुत्ववादी चिरंजीव नितेश राणे यांनी केलेल्या उद्योगात नेमके होरपळले कोण? या संघटनांनी व राणे पूत्राने राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल बदनामीकारक वक्तव्ये करणाऱ्यां विरोधात कधीच तोंड उघडलेले नाही किंवा निषेधही केलेला नाही. उलट या संघटना व त्यांच्या विचारांच्या लोकांनी कुणाच्या अस्मितेवर सतत चिखलफेक केलेली आहे? सध्या छत्रपती शिवराय व संभाजी महाराजांचे शौर्य व कामगिरीचे प्रतीक असणाऱ्या इतिहासाला कांहीतरी निमित्त काढून व त्याला हिंदू मुस्लिम रंग देऊन हा शौयार्चा इतिहास मिटवण्याचा नियोजित प्रयत्न होत आहे. या वादात व आंदोलनात महाराष्ट्रातील मराठा व बहुजन समाजातील युवक व नागरिकांनी स्वतःला दूर ठेवले पाहीजे होते. कारण दंगलीत पोलीस धरपकड करतात. त्यानंतरच्या नरक यातनांना पारावर नसतो. घरातील निष्पाप आई-वडील, भाऊ-बहीण यांना प्रचंड आर्थिक, शारीरिक तसेच मानसिक त्रास होतो. संपूर्ण लाईफ बरबाद होते. जे तुम्हाला भडकावून दंगलीत लोटतात, ते नंतर तुम्हाला मदत करायला तयार नसतात. तुमची साधी ओळखही दाखवत नाहीत. राज्य सरकारकडे प्रचंड बहुमत आहे, केंद्रातही सरकार आहे. मग औरंगजेबाच्या कबरीबाबत काय करायचे, हे सरकारनेच ठरवावे ? सत्ताधारी नेतेच चिथावणीखोर वक्तव्य करून धर्मा-धर्मामध्ये तेढ निर्माण करून महाराष्ट्रात तणाव वाढवत आहेत. अर्थात नागपूरची घटना हा मस्साजोग, मुंडे, वाल्मिकअण्णा प्रकरणाला दुसरीकडे वळविण्याचा प्रकार असल्याची महाराष्ट्रात चर्चा होत आहे व ते सरकारच्या दृष्टिकोनातून योग्य नाही. सरकारी हिंदुत्ववाद्यांचे आहे असे गृहीत धरले, तरी मागे एकदा सावरकरांचा तथाकथित अपमान झाला म्हणून सावरकर गौरव यात्रा काढणारे देवेंद्र फडणवीस आता कोण तो 'चिल्लर' कोरटकर याने छ. शिवाजी महाराजांचा अपमान केला म्हणून शिवाजी महाराजांची गौरव यात्रा काढणार का? दंगलीत सहभागी असणाऱ्या तरुणांचे विचार परिवर्तन तरी कसे करावे? त्यांना हे काय माहित की जर आज औरंगजेब जिवंत असता तर तो देखील आज भाजपमध्ये जाऊन पोहोचला असता. या तरूणांना 'स्टडी' आणि 'कस्टडी' यातील फरक कळायला सुरुवात होईल, तोपर्यंत वेळ गेलेली असेल!

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

धर्मरक्षण वगैरे भूत डोक्यात घुसलेल्या तरुणांनी सावध झाले पाहीजे. कुठल्याही विध्वंसक कृत्यात सहभागी झाल्यास काय होते? या प्रश्नांचा त्यांनी कधी विचार केला का? दंगलीत सहभागी झाल्यावर फौजदारी गुन्हा दाखल होतो, अटक होते, अटकेत गेल्यावर पोलिसांकडून 'सत्कार' होतो, अपुऱ्या जागेत, अस्वच्छ ठिकाणी राहावे, खावे व झोपावे लागते. ज्यांनी उचकून दिलं ते फरार असल्याने तुमच्या आई बापाला तुमच्या जामीनाची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी डाग मोडून पैसे उभे करावे लागतात.

जामीन झाला की ठरलेल्या दिवशी हजेरी सुरू होते. सरकारी केसमध्ये नाव आलं की सरकारी नोकरीतून बाद केले जाते. खाजगी नोकरीत पोलीस रेकॉर्ड काढलं की कुणी दारातही उभं करत नाहीत. व्यवसाय करायला कर्ज काढायला गेलात तरी बँका तीच भूमिका घेतात. मग रोजंदारी एवढंच उरतं. पोलीस ठाण्यात हजेरी लावायला गेला की दिवस गेलाच वाया.

कुठल्याही सणवार, निवडणूक काळात आधी त्यांनाच उचलून चार आठ दिवस आत टाकतात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून. हे सुरू असताना कोर्टाच्या तारखा आणि केस चालूच असते. त्यालाही पैसे लागतात. एवढं सगळं झाल्यावर ना पैसे, ना बचत, ना मालमत्ता, ना लग्न, ना संसार. थोडक्यात एका चुकीने तुमच्या आयुष्याचे बारा वाजतात. सबब, अभ्यास करा, शिक्षण घ्या, चांगला रोजगार बघा, चार पैसे कमवा आणि आईबापांची, लेकरांची काळजी घेऊन सुखी राहा. तुम्हाला धर्मरक्षण करायला सांगणाऱ्या नेत्यांची पोर या भानगडीत पडत नाहीत म्हणूनच ते तुम्हाला उचकून देतात. 'हिंदू -मुस्लीम' नावाचा अंमल चढला की भ्रमिष्ट विचार सुरू होतात. हे भ्रमिष्ट विचार म्हणजे 'मुस्लिम हे या देशाचे शत्रू आहेत', 'हिंदूंवर अन्याय मुसलमानांनीच केला', 'मुसलमानांमुळे या देशाचे तुकडे झाले', 'मुसलमान लव्ह जिहाद करतात', 'मुसलमान हे आपल्या प्रगतीमध्ये अडसर आहेत', 'मुसलमान हे दहा-बारा मुलांना जन्माला घालतात. कारण त्यांना लोकसंख्या वाढवून देश ताब्यात घ्यायचा आहे', 'गांधी- नेहरू यांचे पूर्वज मुस्लिम होते', वगैरे वगैरे. या भ्रमिष्ट विचारांची उधळण होते.

मग त्यांच्या दुकानात जायचे बंद करा असे कुणीतरी ओरडतो. शाकाहार श्रेष्ठ असे म्हणू लागतात आणि आपला धर्म श्रेष्ठ म्हणत पळत सुटतात ! खराखुरा घडलेला इतिहास न सांगता उलटा इतिहास सांगत ते सगळीकडे अफवा पसरवत असतात.

मोबाईल हातात घेतला की आजूबाजूला काय चालले आहे याचाच विसर पडतो. हा देश हिंदुत्ववाद्यांचा आहे आणि तेच तेवढे देशभक्त आहेत असे भ्रमिष्ट विचार जिकडे तिकडे ते नाचवत फिरवले जातात. जो हिंदूत्व मानत नाही ते सगळे देशद्रोही असेही डोके फिरल्यासारखे ते बडबडत असतात.

भारताच्या निर्मितीपासून आज अखेर भारताने जो प्रवास केला तो हिंदुत्वावर केला का? या देशाच्या प्रगतीसाठी सर्व धमार्चे लोक कंबर कसून उभे होते आणि त्यांनी स्वतःची आयुष्यं झोकून दिलेली आहेत. हे यापैकी कुणालाच दिसत नाही? हातात त्रिशूल घेऊन या देशाची देशभक्ती दाखवायची नसते, तर विज्ञानात अफाट प्रगती करून देशाला सर्वोच्च स्थानावर नेऊन दाखवायची असते असे विचार यांच्या भेजात शिरतच नाहीत. इतिहासाचं कवडीचे ज्ञान नसलेल्या नारायण राणे पुत्राला काय समजणार छत्रपती शिवाजी महाराज किंवा अफजल खान?

अफजलखानाचा कोथळा बाहेर काढल्यानंतर शिवाजीराजांनी त्याच्या कबरीसाठी आणि दिवाबत्तीसाठी आर्थिक मदत केली होती. तसेच औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याची कबर खुलताबाद येथे तयार करण्यात आली. काही ऐतिहासिक साधनांनुसार, शाहू महाराजांनी कबरीच्या परिसराची साफसफाई, दुरुस्ती आणि देखभाल होण्यासाठी काही आर्थिक मदत दिली होती, त्याचेही इतिहासात दाखले आहेत.

छत्रपती शिवाजी राजे काय की छत्रपती शाहू काय, हे उच्च सुसंस्कृत होते. म्हणून ते 'मरणांती वैराणी' म्हणजे मेल्यानंतर वैर संपते, हे हिंदू धर्माच्या सहिष्णुतेतेच्या ब्रीदवाक्यानुसार जगले. शिवाजी राजांच्या नावाचा उदो उदो करणारे आजचे राजकर्ते मात्र असहिष्णु होत अफजल खान आणि औरंगजेबाच्या कबरी उखडून टाकण्याची भाषा करत आहेत. म्हणजे खरे तर ते शिवाजीराजांच्या आदर्श वागणुकीचा अपमानच करत आहेत. अफजलखान काय की औरंगजेब काय, या दोघांच्या कबरी वीर मराठ्यांच्या पराक्रमाच्या शौर्यगाथा सांगणाऱ्याच आहेत. या भूमीचा गळा घोटण्यासाठी आलेल्या ह्या मोगलांना याच मातीत शिवाजीराजांनी आणि मराठ्यांनी गाडले, हा ज्वलंत इतिहास या कबरी उखडून नष्ट करण्याचा प्रयत्न राजांचे नाव घेत परधर्म द्वेष वाढवणाऱ्या मतलबासाठी राजकारण करणारे नतद्रष्ट करंटे राजकारणीच करू शकतात. त्यांच्या या काव्याला अनेक शिवभक्त बळी पडत आहेत, हे दुर्दैवी आहे. थोडक्यात काय तर अफगाणिस्तानातील बामियान येथील बुद्धांच्या मूर्ती उखडून टाकणारे आणि अफजलखान, औरंगजेब यांच्या कबरी उखडून टाकणाऱ्यांची मानसिकता एकाच प्रकारची आहे, असे म्हटले तर चूक ठरू नये. ■ ■ ■

# राणेंना आवरा!

महाराष्ट्राचे विद्यमान मंत्री नितेश राणे यांना आवरणे आवश्यक झाले आहे. एका पाठोपाठ एक वादग्रस्त विधाने करून त्यांनी सरकारची अब्रू धुळीस मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न केला आहे. आपण मंत्री पदावर आहोत त्यामुळे आपण कसे बोलले पाहिजे, यांचे ज्ञान नितेश राणे यांना देण्याची वेळ आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज्यांचा सैन्यात एकही मुस्लिम सैनिक नव्हता असे वादग्रस्त विधान नितेश राणे यांनी केले, या त्यांच्या बोलण्यातुन त्याचे अज्ञान पुढे आले आहे.कदाचित राणे यांना शिवाजी महाराजांचा इतिहास माहित नसावा अश्या प्रतिक्रिया समोर आल्या. राणेना वादग्रस्त विधाने करून काय साध्य करायचे आहे ? असा प्रश्न लोकाना पडलेला आहे.

इतिहासाचे अवलोकन केले असता शिवाजी महाराज्यांच्या सैन्यात अनेक मुस्लिम सैनिक होते. सिद्दी हिलाल,सिद्दी वाहवाह,सिद्दि इब्राहिम, नुरखान बेग, मदारी मेहत्तर, महाराजांचा वकील काजी हैदर,आरमाराचा पहिला सुभेदार दयासारंग, रुस्त मेजमान हा महाराजांचा खास मित्र होता. अश्या प्रकारे शिवाजी महाराजांचा सैन्यात मुस्लिम सैनिक होते. याची नोंद इतिहासकारांनी घेतलेली आहे. त्याच बरोबर सभासदांच्या बखरी मध्ये सुध्दा शिवाजी महाराज यांचे सैन्यात मुस्लिम सैनिक होते असा उल्लेख आला आहे.

पाश्चिमात्य इतिहासकार यांनी सुध्दा या बाबीला मान्यता दिली आहे. या प्रत्येक सैनिकांवर महत्वाच्या जबाबदाऱ्या महाराजांनी सोपविल्या होत्या. जातीभेदाच्या पलीकडे जाऊन महाराजांसोबत राहुन तत्कालीन काळात सैनिकांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली होती. अठरा पगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन आपल्या शत्रुंशी लढून महाराजांनी आजच्या समाजापुढे नवा आदर्श ठेवला आहे.

मात्र काही लोक जाणून बाजून वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण बिघडविनाचा प्रयत्न करीत आहेत. शिवाजी महाराज हे कुण्या एका जातीचे नव्हते. त्यांनी अखिल मानवजात माझी आहे. त्या सर्वांसाठी समान पध्दतीने राज्यकारभार त्यांनी चालवला, म्हणून महाराज रयतेचे राजे झाले.

अलीकडे शिवाजी महाराजांच्या बद्दल वाईट विधाने करण्याचा सपाटा चालू आहे. सरकारने अश्या लोकांना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे. शिक्षा झाली तर लोक वळणीवर येतील, अन्यथा दिवसागाणिक बेताल व्यक्तव्ये करुन सामाजीक वातावरण बिघडविण्याचा क्रम सुरूच राहील. नितेश राणे यांना आवरणे फार आवश्यक आहे.

एक मंत्री, प्रमुख पदाधिकारी सार्वजनिक जिवनात वावरात असताना,अशी बेताल व्यक्तव्य करू शकतोस कसा हा प्रमुख प्रश्न आहे. आपल्या योग्य आचरणाने राजकीय पुढाऱ्यांनी समाजापूढे आदर्श निर्माण करायला हवा. पंडित नेहरू, लाल बहादूर शास्त्री, अटल बिहारी वाजपेयी या सारख्या नेत्यांनी राजकारण करीत असताना नैतिक मूल्यांची जपवणूक केली आहे. कधीही समाजा-समाजात तेढ निर्माण होईल अशी व्यक्तत्वे या पुढाऱ्यांनी केली नाही. मात्र अलीकडे राजकीय पुढारांची विधाने दोन समाजात तेढ निर्माण करनारी आहेत असे अनेकदा दिसून आले.

भारत हा बहूभाषीय, बहू धार्मिक देश आहे.जातीच्या आधारावर यापूर्वी आपल्या देशाचे विभाजन झाले आहे. गेल्या सत्तर वर्षात आपण समाजात गुण्यागोविंदाने वावरत आलो आहोत. सामाजिक सलोखा टीकविणे सर्वांची जबाबदारी आहे. मात्र राजकिय नेत्यांनी धर्मावर आधारीत विधाने करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचे कार्य करू नये, अशी माफक अपेक्षा जनतेची आहे.

आपले पद काय आहे? आपण कसे बोलले पाहिजे? आपल्या विधानाचा समाजावर काय परिणाम होईल? आपल्या विधानामुळे सुरक्षितेला धोका पोहचेल का? याचा विचार राजकारणांनी करणे आवश्यक आहे.

नितेश राणे यांचे वादग्रस्त विधान समाजा- समाजात तेढ निर्माण करणारे आहे. शिवाजी महाराजांची लढाई इस्लामच्या विरोधात होती. हिंदू- मुस्लिम वाद शिवाजी महराजांचा मुख्य मुद्दा होता. हिंदूना इस्लामाच्या समोर झुकू दिले नाही. अश्या बेताल वक्तव्यामुळे भाजपाची गोची झाली आहे. शिवाजी महाराज कोण्या एका धर्माचे नव्हते. हिंदू धर्मावर महारामांची श्रद्धा होती. पण मूसलमान धमार्चा महाराजांनी द्वेष केला नाही. उगाचच हिंदू मुस्लिम द्वेष पसरवून राजकारण गढूळ करू नये.

नितेश राणे यांचे अनेक वादग्रस्त विधाने चर्चेचा विषय झालेली आहेत. केरळ हा मिनी पाकिस्थान आहे,असे त्यांनी सांगितले. राहूल गांधी व प्रियंका गांधी या निवडून कश्या येतात, असा प्रश्न त्यांनी केला. केरळ राज्याला मिनी पाकिस्तान म्हणणे म्हणजे देशात अशांतता निर्माण करणाचा प्रयत्न करणे आहे.

राहूल गांधी व प्रियंका गांधी यांनी केरळच्या वायनाड मधून निवडून आले. लोकशाहीच्या मागार्ने ते निवडून आले. त्याला मिनी पाकिस्तान म्हणणे म्हणजे लोकशाहीच्या मुळावरच घाव घालणे आहे.

राणेनी दहावी-बारावी परिक्षेला बुरखा घालून येणाऱ्यांना परीक्षेला बसू देऊ नका असे विधान केले होते. ग्रामीण भागात सरपंच हा गावचा प्रमुख असतो, याला निधी देताना तो कोणत्या पक्षाचा आहे म्हणून त्याला निधी वाटपात दुजाभाव करता येणार नाही. सर्व समान घटकांच्या विकासासाठी सरकार काम करते,अमुक त्या पक्षाचा तमुक त्या पक्षाचा असा विचार करून विकास कामावरचा निधी वाटप केल्या जात नाही.

मात्र या नितेश राणेनी, केवळ भाजपाच्या विचारसरणीचा सरपंचांना विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्या जाईल अशी भूमिका जाहीर केली, त्यामुळे अनेक सरपंचानी नाराजी व्यक्त केली. भाजपामध्ये वाचाळविचारांचा भरणा झाला आहे का? असा प्रश्न सामान्य जनतेला पडलेला आहे. नितेश राणे, निलेश राणे, गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत यासारख्या नेत्यांच्या बेताल बोलण्यामुळे भाजपाची अनेकदा गोची निर्माण झाली आहे.

लालकृष्ण आडवानी, अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळात भाजपाकडे एक सुसंस्कृत व सामाजिक राजकीय नीतिमूल्य जपणारा पक्ष म्हणून बघितले जात होते. मात्र वाचाळवीर नेत्यांचा बेजबाबदार बोलण्यामुळे पक्षाची प्रतिमा जनमानसात खालवली जात असताना सुद्धा मंत्री नितेश राणे यांच्या बोलण्याचा कोणत्याही भाजपा नेत्यांनी खंडण केले नाही किंवा राणेनां साधा जाब विचारला नाही, यातून सरकारची पत जाण्यास मदत झाली. भाजपा आतून नितेश राणेना बोलण्यास भाग पाडत आहे का ? असा प्रश्न राजकीय निरीक्षकांना पडलेला आहे.

नितेश राणे यांच्या बेजबाबदार बोलण्याचा सिलसिला असाच सुरु राहणार आहे.यांचा बोलविता ध्वनी कुणी वेगळाच आहे.कट्टर हिंदुत्ववादी प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न राणे करीत आहेत. त्यांनी ती जरूर करावी परंतु भारतात बंधुभाव नांदवा अशी भारतीय जनमानसाची ईच्छा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरची असा दे, हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,मतभेद नसू दे असे म्हटले आहे.

कट्टर हिंदुत्ववादी प्रतिमा जपत असताना नितेश राणे यांनी कमीत कमी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या या गीताचा आदर्श पुढे ठेवावा. जेणेकरून सामाजिक सलोखा कायम राहील. मात्र एका पाठोपाठ एक बेताल वक्तव्य करून सामाजिक वातावरण दुषित करणाऱ्या नितेश राणेना आवरणे भाजपसाठी आवश्यकच आहे. कोणीतरी पुढे येऊन ही समज राणेना देणे भविष्यकाळात आवश्यक आहे. ■ ■ ■

नितीन कैलासराव गोहने
हिरापूर, ता. सावली,
जि. चंद्रपूर
8275393387

## मंदिरे सरकारच्या ताब्यात का?

वाचक लिहितात

प्रयागराज येथील कुंभमेळ्यात सर्वत्रच्या हिंदुत्वनिष्ठ संघटना, आखाडा परिषद, साधू-संत यांनी कोणतेही मंदिर कुठल्याही सरकारच्या कह्यात असता कामा नये, असा एकमुखी निर्णय घेतला होता. या पार्श्वभूमीवर अमरावती येथे नुकतेच महाराष्ट्र मंदिर महासंघाचे अधिवेशन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्याची बातमी वाचण्यात आली.

मंदिरे हा हिंदू संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. तो जतन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. आपला धर्म, संस्कृती जीवंत ठेवण्याचे कार्य वेळोवेळी मंदिरांमुळे झालेले आहे. मात्र, आज मंदिरे सरकारच्या ताब्यात आहेत. भ्रष्ट नेते अशा मंदिरांचे विश्वस्त बनले आहेत. तेथे होणारा भ्रष्टाचार देखील वेळोवेळी उघडकीस आला आहे. अशावेळी सर्वसामान्य भक्तांना प्रश्न पडतो की, आज देशभरात कोणतीही मशीद किंवा चर्च सरकारच्या ताब्यात नाही; मग मंदिरे सरकारच्या ताब्यात का?

शिवाय, वक्फ कायद्याद्वारे मंदिरांच्या जमिनींवर अतिक्रमण होत असल्याच्या घटना देखील घडत आहेत. या गंभीर विषयावर सरकारने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अधिवेशनात करण्यात आली. तसेच मंदिरे धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे, मंदिरांचे पावित्र्य राखणे, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे येथे मद्य-मांस बंदी करणे, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर देखील चर्चा करण्यात आली. या अधिवेशनातच मंदिर महासंघाचे पुढील अधिवेशन नागपूर येथे होण्याचे जाहीर करण्यात आले.

तेव्हा नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनात सर्वत्रच्या मंदिर विश्वस्तांनी सहभागी होऊन या धर्मकार्यात योगदान द्यावे आणि आम्हा भक्तांना अपेक्षित असलेले प्रत्येकच मंदिर आदर्श मंदिर व्हावे. मंदिर महासंघाच्या नागपूर येथील द्वितीय अधिवेशनासाठी हार्दिक शुभेच्छा!

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# असंगाशी संग प्राणाशी गाठ!

चांगल्या व्यक्तीशी आपणं संबंध ठेवले नाहीत तर ते आपल्या जीवावर उठू शकतात.अशीच काहीशी परिस्थिती महाराष्ट्रात आज सर्वत्र पहायला मिळते आहे. याचे कारणं राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण होय.

आज कुणीही महिला सुरक्षित दिसून येत नाहीत. पुण्यासारखे विद्येचे माहेरघर आज सुरक्षित राहिलेले नाही.पुणे, मुंबई, दिल्ली, नागपुर सारखी अनेक शहरे आज सुरक्षित राहिलेली नाहीत. याची वेगवेगळी कारणे देता येतील. परंतु प्रमुख कारणं हे राजकारणाशी संबंधित गुन्हेगारीचे वाढते प्रमाण हे आहे.

गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळत असल्याने ते निर्ढावलेले आहेत. संरक्षण यंत्रणांना ते घाबरत नाहीत. तर जनतेच्या संरक्षणासाठी ज्यांची नियुक्ती झालेली आहे तेच आज गुन्हेगारांच्या हातात हात घालून जनतेत मिरवीत आहेत. मग कायद्याचा धाक कसा असणार आहे? नुकतीच चंद्रपूर सारख्या शहरात बारमध्ये युवकांच्या टोळीकडून पोलिसाची हत्या करण्यात आली आहे. दाद महाल वार्ड येथील तीन युवकांना ताब्यात घेतले आहे. तर काहीजण फरार झाले आहेत. यात दिलीप सुभाष चव्हाण या पोलिस शिपायाचा मृत्यू झाला आहे. तर समीर चाफले हे जख्मी झाले आहेत. पोलिस विभागाची ही गत तर सामान्य माणसांचे?

लोकशाही व्यवस्थेत निवडणुक जिंकून येणाऱ्या व्यक्तींना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे.ते साम, दाम, दंड व भेद याचा वापर करून निवडून येतात.आणि जनतेवर अधिराज्य गाजवितात.निवडून आल्यानंतर त्यांची बडदास्त ही एखाद्या हिरोला शोभेल अशी असते. त्यांना लोकसेवक कसे म्हणावे हेच कळत नाही?

ते निवडून आल्यानंतर लोकसेवक, जनतेचे लोकप्रतिनिधी म्हणून कायदे मंडळात जाऊन बसतात. जेंव्हा की त्यांना कायद्याचे,विधी मंडळाचे किंवा कुठल्याही प्रकारचे विशेष ज्ञान हे प्राप्त नसते.ते पैशाच्या जोरावर आणि विविध प्रकारचे आमिष खुलेपणाने दाखवून निवडणूक लढतात आणि जिंकून येतात. जेंव्हा की हे घटनाबाह्य काम आहे.

हे सुप्रीम कोर्टाला पणं ज्ञात आहे. परंतु सुप्रीम कोर्ट सुध्दा याबाबत हतबलता दाखवून, ताशेरे ओढून मोकळी होते आहे. कारण कायदे करून ते अंमलात आणणे हे कुठल्याही कोर्टाचे काम नाही.कुठलिही कारवाई ही योग्य पध्दतीने, कायद्याचे पालन करून झालेली आहे किंवा नाही याबाबतचे मत नोंदविण्याचे काम कोर्ट करीत असते.

कोर्ट आदेश देऊन मोकळी होते. आदेशाची अंमलबजावणी करणारे लोक सक्षम नाहीत.ते यातूनही आपला स्वार्थ साधू इच्छितात. यामुळे कोर्टाचा वचक असलेला पाहायला मिळत नाही.

सत्तेत आज चांगली माणसे जाऊन बसू शकत नाहीत. असे जनता जनार्दन जेंव्हा छातीठोकपणे सांगते आहे. याचाच अर्थ आम्हींच लोकशाहीचा मर्डर, खुण करण्यासाठी कारणीभूत ठरतो आहे. याकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? आज

सत्तेतील लोकांवरच अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. तरीही ते आमदार, खासदार, मंत्री बनून सन्मान प्राप्त करतात.स्वतःची सुरक्षा सरकारी खचार्ने करून घेतात. जनतेला सुरक्षा कवचची गरज वाटत नाही. तीचा जीव स्वस्त झाला आहे.कुणीही यावे आणि सहज मारून जावे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

मारल्यानंतर आम्ही वर्षोगणती कोर्ट कचेऱ्या करीत बसतो. निकाल हाती लागेपर्यंत अर्धेअधिक लोक जगातून गेलेले असतात. मग सबळ पुराव्या अभावी गुन्हेगारांना मोकळे सोडून दिले जाते. ही आपली न्याय देण्याची पध्दत विकसित झालेली आहे.

आम्ही छ.शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात रहातो आहे.येथे तर गुन्हेगारांना मोकळे रान मिळाले आहे. सज्जन लोकांना जीवन जगणे कठीण काम झाले आहे. गुन्हेगारांना मिळणारा राजकीय आश्रय हा अत्यंत चिंतेचा विषय बनला आहे. ही गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी कधी कुणाचा बळी घेतील हे सांगता यायचे नाही.

आपल्याकडे मराठीत एक म्हण आहे.. असंगाशी संग प्राणाशी गाठ ' तशी आज परिस्थिती महाराष्ट्रात सर्वत्र पहायला मिळते आहे.महाराष्ट्रात गुन्हेगारांना राजकीय आश्रय मिळतो आहे ही फार चिंचेची बाब ठरते आहे. आता याबाबत जनतेनेच काय तो ठोस निर्णय घेतला पाहिजे. गुन्हेगारीत ज्यांची नावे आहेत त्यांना कुठल्याही परिस्थितीत निवडून देता कामा नये. जे पक्ष गुन्हेगारांना उमेदवारी देतील त्या पक्षाचा पराभव निश्चित झाला पाहिजे. याची काळजी मतदारांनी घेतली पाहिजे. तरच आपली लोकशाही व्यवस्था ही जीवंत असणार आहे. याची काळजी मतदारांनी घेतली पाहिजे.

केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात गंभीर गुन्हेगारांवर आजीवन राजकीय बंदी घालण्यास मनाई दर्शविलेली आहे.ही फार चिंतेची ठरते बाब आहे.याची दखल जनता घेणार आहे कां?

----------------

मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार
राजुरा, जि. चंद्रपूर.
९५११२१५२००
■ ■ ■

# उन्हाळ्यात कोल्ड ड्रिंक नाही तर फायदेशीर ठरेल या पेयाचे सेवन



उन्हाळ्यात लोक अनेकदा वेगवेगळ्या प्रकारचे कोल्ड्रिंक्स पितात, परंतु त्यातील रसायने आणि प्रिझर्वेटिव्ह्ज शरीराला हानी पोहोचवू शकतात. त्याऐवजी जर तुम्ही घरी एक खास कोल्ड्रिंक बनवले तर ते तुम्हाला ताजेतवाने तर वाटेलच, पण ते सेवन केल्याने तुमचे आरोग्यही अबाधित राहील.

आयुर्वेदात तुळशीला औषधी वनस्पतींची राणी म्हटले आहे. त्याच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुणधर्म असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. उन्हाळ्यात, थंड तुळशीचे सरबत शरीराला डिटॉक्स करते आणि ऊर्जा प्रदान करते.

तुळशीचे कोल्ड्रिंक बनवण्याची पद्धत खूप सोपी आहे. यासाठी 20-25 ताजी तुळशीची पाने पाण्यात उकळा आणि थंड होऊ द्या. नंतर त्यात एक चमचा मध, थोडासा लिंबाचा रस आणि चवीनुसार काळे मीठ घाला. ते चांगले मिसळा आणि फ्रीजमध्ये थंड करा किंवा बर्फ घालून सर्व्ह करा. जर हवे असेल तर त्यात पुदिन्याची पाने आणि भाजलेले जिरे देखील घालता येतात, ज्यामुळे त्याची चव आणखी वाढते. हे पेय नैसर्गिकरित्या ताजेतवाने आहे आणि शरीराला उष्णतेपासून आराम देते.

तुळशी कोल्ड्रिंक पिल्याने शरीराला चिडचिड, थकवा आणि उष्माघातापासून संरक्षण मिळते. त्यासोबतच तुमची पचन सुधारते आणि गॅस, अपचन यासारख्या पोटाच्या समस्यांपासून आराम देते. तुळस शरीराला डिटॉक्स करते आणि त्वचा देखील सुधारते. उन्हाळ्यात घाम आणि गरम हवेमुळे येणारा थकवा दूर करण्यासाठी हे पेय खूप प्रभावी आहे. तसेच, हे पेय ताण कमी करते आणि मनाला शांती देते.

तुळशीचे शीतपेय उन्हाळ्यात नैसर्गिक ऊर्जा पेयासारखे काम करते, जे शरीराला कोणत्याही दुष्परिणामांशिवाय थंडावा आणि ताजेपणा देते. मधुमेहाच्या रूग्णांसाठी सकाळी रिकाम्या पोटी तुळशीचे पाणी पिणे फायदेशीर असते. त्यामधील यूजेनॉल आणि कैरेयोफिलिन तुमच्याा शरीरातील पैंक्रियाटिक बिटा सेल्सला निरोगी ठेवण्यास मदत करतात. शरीरातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. तुळशी खाल्ल्यामुळे शरीरातील इन्सुलिनची मात्रा नियंत्रित राहाते.

तुळशीचा तुमच्या त्वचेसाठी देखील वापर केला जाऊ शकतो. तुळशीच्या पानांची पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि 10-15 मिनिटांमध्ये धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील पिंपल्सच्या समस्या दूर होतात त्यासोबत तुम्हाला पिग्मेंटेशन किंवा काळ्या डागांच्या समस्या होत नाहीत. तुळशीच्या पानांमध्ये अँटिऑक्सिडेंट्स असतात ज्यामुळे तुमचा चेहरा अधिच चमकदार आणि निरोगी बनतो. रिकाम्या पोटी तुळशीचे 5-6 पाने चावून खाल्ल्यामुळे तुमची ओरल हेल्थ निरोगी राहाण्यास मदत होते. ■ ■ ■

अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## ठोक भूषण पुरस्कार

राज्याच्या उज्वल परंपरेला
ज्यांनी केलं कलंकीत
अशा राजकीय नररत्नांना
एक एप्रीलला केलं जावं
सन्मानित ..

एलाचं बी बेलाला लावण्यात
जे आहे पटाईत
त्यांना 'वाचाळ भूषण ' ने
केलं जावं गौरवान्वित ..

ज्यांनी दादागिरी करून
केली दहशत निर्माण
अशा टॉप राजरत्नांचा
'ठोक भूषण 'ने करावा सन्मान!



[illegible]




[illegible]



[illegible]



[illegible]


[illegible] SIP [illegible] (KMAMC / [illegible]) [illegible] SIP [illegible]. [illegible] SIP [illegible]. SEBI [illegible] AMFI [illegible] SIP [illegible] KMAMC [illegible] (SIPs) [illegible] NACH [illegible] UPI [illegible] (KMAMC) [illegible]






[illegible]

# शब्दकोडे क्रमांक २०६३



**आडवे शब्द :-**
१) मोरपिसाचा मुकुट घालून पहाटे देवाची गाणी म्हणत फिरणारा
५) पेशवाईतील आनंदीबाईंचा गारद्यांना दिलेले निरोप
९) त्रासलेला
१०) लक्ष्मी नारायण
१३) वर्तन
१४) तात्काळ मिळणारी लोकप्रियता
१५) दैव
१७) बेचव
१८) काड्यांची केरसुणी
१९) भांडणे लावणे
२०) प्रयत्न
२२) ढग, लवकर
२३) दृष्टी
२६) बारा वर्षांचा काळ
२८) गाय
३०) तलवारीचे म्यान
३१) नवरदेव
३३) (संधी) घालविणे, पिटाळणे
३५) शाळेतील बसण्याचे साधन
३६) मधुमक्षिका
३७) पत्र
३८) एक जुणी लेखणी
३९) जिम्मेदार
४०) एक चतुर्थांश
४१) त्वचारोग
४२) मुकुटमणी
४५) ठार मारण्यास योग्य
४७) वाहणारी हवा
४८) मर्कट
५१) जावळा
५२) समोरासमोरची छोटी लढाई
५४) निर्धन मनुष्य
५७) लेखणी
५९) अग्नी
६१) गवताचे पान
६३) भ्रंश, भ्रम
६४) कोवळ्या दुधाचा पदार्थ
६६) प्रभात
६७) एक जंगली फूल
६९) पावसाची झड
७०) मोठा भाऊ गल्लीतील गुंड
७१) धावणे
७२) घरगुती थंड पेय

**उभे शब्द :-**
१) चावट
२) मंद, आळसावलेला
३) पाटाचा जोडीदार
४) फिकीर
५) नवरा
६) आईची बहीण
७) धपाटा
८) धनी
११) धागे विणून कापड तयार करण्याचे साधन
१२) आभाराचा एक शब्द
१३) हलकी थप्पड
१४) वाकबगार पटाईत
१५) नूतन
१६) ऐतिहासिक गद्य लिखाण
१७) जोराचा शिडकावा, हबका
१९) गर्द लाल रंग
२१) किंचित कडू चव
२४) चकचकीत
२५) छोटी घागर
२७) गीत
२९) एकरूप तल्लिन,
३२) सपाटून
३४) कमीशन, व्यापारी बट्टा
३५) वडिलांचे मराठी संबोधन
३९) हिशेबाची एक बाजू
४०) चरण
४१) पोथीचे परत परत वाचन
४३) दागदागिने
४४) जनन
४५) यज्ञ
४६) ढग
४८) धनी
४९) अन्न घशाशी येणे, ढवळणे
५०) मोठे पसरट खोलगट ताट
५३) विळखा
५५) एक शेंगभाजी
५६) अनुत्तीर्ण
५८) मुरगळणे
६०) व्यायाम
६२) गुरांचा घोळका
६४) व्यय
६५) बारा महिन्याचा काळ
६६) सदोदित
६८) द्रवपदार्थ
६९) हिंदीत सर्व

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नरेंद्र मोदींच्या नावाखाली भामट्याचा आठ कोटींचा गंडा?

**नाशिक ।** राष्ट्रीय नमो सेनेचा प्रमुख असल्याची बतावणी करून आठ कोटी रूपयांचे कर्ज मंजूर करुन देण्यासाठी प्रोसेसिंग फीच्या नावाखाली सुमारे ८० लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याचा प्रकार नाशिकमध्ये नुकताच उघडकीस आला आहे. या प्रकरणी गंगापूर पोलिस ठाण्यात तथाकथीत राष्ट्रीय नमो सेनेचा अध्यक्ष व आखिल मराठी पत्रकार परिषदेच्या कथित अध्यक्षासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र गेल्या काही दिवसात पाच ते सहा तक्रारी दाखल झाले असून ही संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

याप्रकरणी नाशिकमधील अविनाथ थोरात (वय ६५) या व्यावसायिकाने गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी किशोर बिरदमल भंडारी (वय ६५), मुलगा योगेश किशोर भंडारी (वय ३९) व श्रीपाद किशोर भंडारी (वय ३५) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या सर्वांनी संगनमताने थोरात यांची फसवणूक केल्याने नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे किशोर भंडारी याने भाजपच्या उपशाखा असलेल्या राष्ट्रीय नमो सेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर असल्याची बतावणी केली व महाराष्ट्राचा अध्यक्ष असल्याचे सांगून नाशिकमध्ये अनेकांना गंडा घातल्याचे वृत्त आहे. त्यामुळे जनमानसात प्रभाव पडावा म्हणून नाशिकच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या संघटनेच्या माध्यमातून अनेकांना फसवल्याचे वृत्त आहे. नाशिक मध्ये एका पत्रकारालाही गंडा घालण्याचा

## पुण्याच्या किशोर भंडारीस पोलिस घेणार ताब्यात





प्रयत्न भंडारीने केला होता. त्यांच्याकडून देखील पाच लाख रुपये घेतले होते. तथापि, संबंधित पत्रकाराचा राजकीय क्षेत्राशी जवळून संबंध असल्यामुळे जवळपास पाच वर्षानंतर त्यांचे पैसे पुन्हा परत केल्याची घटना देखील घडली आहे. म्हणून संबंधित पत्रकाराने पोलीस ठाण्यात फिर्याद केली नाही. या भंडारीचे नाशिकमध्ये रविवार कारंजा येथे काही नातेवाईक असून त्यांचा देखील या गुन्ह्यात सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आहे.त्यांना देखील चौकशीसाठी बोलविण्यात येणार असल्याचे समजते. दरम्यान उशिरा हाती आलेल्या वृत्तानुसार नाशिकच्या अंबड औद्योगिक वसाहतीतील एक उद्योजक सुनील इच्छाराम बहाळकर यांना देखील तीन कोटी रुपये कर्ज मिळवून देतो असे सांगून साडेसात लाख रुपये प्रोसेसिंग फी च्या नावाखाली घेतल्याची फिर्याद दाखल झाली आहे. त्यातही वरील किशोर भंडारीसह अजय शेंडे, प्रशांत चोपडा, जितेंद्र लोढा, संदीप घोरपडे, सुजाता घोरपडे या संशयित आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. त्यामुळे गरजूंना लुटणारी एक टोळी निर्माण झाल्याची शक्यता पोलिसांमुळे व्यक्त होत आहे. दरम्यान बांधकाम व्यावसायिक देवेंद्र भालेराव यांना देखील किशोर भंडारी व त्याच्या दोन मुलांनी तीस लाख रुपयांना गंडा घातल्याची तक्रार रात्री उशिरा दाखल झाली. त्यामुळे हे प्रकरण अतिशय गंभीर असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

### मोदींच्या नावाने पैसे गोळा करणारा पहिला भामटा

राष्ट्रीय नमो सेना व जाज्वल्य मीडिया हाऊस या नावाने एक राजकीय संघटना तर दुसरी पत्रकारितेतील संघटना तयार करून किशोर भंडारी या भामट्याने पुण्याहून नाशिक मध्ये येऊन अनेकांना करोडो रुपयांचा गंडा घातल्याचे दिसून येत आहे. या कामी रविवार कारंजा येथील जितेंद्र भंडारी या त्यांच्या कथित पुतण्याने त्यांना मदत केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न होत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात भंडारीसह त्याच्या नातेवाईकांना देखील अटक होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे पैसा गोळा करताना त्याची दोन्ही मुले देखील त्याला या कामी मदत करीत असल्याचे अनेकांच्या तक्रारीत स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान मोदींच्या नावाखाली अफाट पैसा गोळा केल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. पोलिसांनी या संशयित आरोपींच्या मुस्क्या आवळाव्यात अशी मागणी आता नाशिकमधून होत आहे. आतापर्यंत पाच ते सहा फिर्यादी पोलीस दप्तरी दाखल झाल्या असून त्यातून करोडो रुपये गोळा केल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे राष्ट्रीय नमो सेना या संघटनेच्या नावाखाली आपले साम्राज्य पसरवत असतानाच एखाद्याने पैशाचा पाठपुरावा करताच त्याला पत्रकार असल्याची दमदाटी भंडारी कुटुंबाकडून होत असते. कदाचित येत्या आठ दिवसात अनेक तक्रारी दाखल होण्याची शक्यता पोलीस प्रशासनाकडून व्यक्त होत आहे. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस अधिकारी तृप्ती सोनवणे यांनी कठोर तपासाला सुरूवात केली असून येत्या दोन दिवसात सर्व आरोपींना अटक केली जाईल असे त्यांनी सांगितले.

### भंडारीने पुण्यातही हाच पँटर्न राबविला

पुण्यात एका फिर्यादीने एचडीएफसी बँकेकडून १ कोटी ६० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. बँकेने तडजोड करुन १ कोटी ३० लाख रुपये भरण्यास सांगितले. त्यांच्याकडे एवढे पैसे नसल्याने किशोर भंडारी याने त्यांना फॉरेन फंडामधूनआठ कोटी रुपये कर्ज मंजूर करुन देण्याचे आमिष दाखविले. प्रोसेसिंग फी म्हणून नऊ लाख रुपये योगेश भंडारी याने आरटीजीएस द्वारे स्वीकारले. तसेच किशोर भंडारी याने संदीप घोरपडे व सुजाता घोरपडे यांची ओळख करुन देऊन आठ कोटी रुपयांकरीता दीड टक्के प्रोसेसिंग फी भरण्यास सांगितले. ते ३ लाख २० हजार रुपये प्रसाद घोरपडे यांच्या खात्यात भरण्यास भाग पाडले. कर्ज मंजूर न करता तसेच त्यांचे फर्ममध्ये गुंतवणुक न केल्यामुळे फिर्यादीने गुंतवलेले १२ लाख रुपये परत मागितले. तेव्हा त्यांनी फिर्यादीस 'मी नमो सेनेचा अध्यक्ष व अखिल मराठी पत्रकार परिषदेचा अध्यक्ष आहे. माझे कोणी वाकडे करुन शकत नाही. कोणी काही प्रयत्न केला तर गोळ्या घालून मारुन टाकील. माझे राजकीय पुढाऱ्यांशी उठणे बसणे आहे', अशी धमकी दिली. संदीप घोरपडे याने फिर्यादीच्या मोबाईलवर हातात पिस्तुल घेतलेले गुंडाचे फोटो व इतर राजकीय पुढाऱ्यांबरोबरचे फोटो पाठवून फोन करुन पैसे परत देणार नाही, अशी धमकी दिली. या धमकीमुळे त्यांनी घाबरून पोलिसांकडे धाव घेतली. पोलीस निरीक्षक पासलकर अधिक तपास करीत आहेत.

## नाशिकमध्ये यंग इंडिया पश्चिम क्षेत्र परिषद; मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती

**नाशिक ।** भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) यंग इंडियन्स,यंग इंडिया नाशिक चॅप्टरतर्फे २० ते २३ मार्च दरम्यान पश्चिम क्षेत्र परिषद बैठक ( डब्ल्यूआरसीएम) आयोजित करण्यात आली आहे. बैठकीसाठी महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेश आणि गुजरातमधील दोनशेहून अधिक प्रतिनिधी एकत्र येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. या कार्यक्रमाच्या समारोप सत्रात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून




उपस्थित राहणार आहेत. २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता शहरातील "द ट्रीट हॉटेल, येथे ते युवा नेतृत्व, मेक इन महाराष्ट्र, आगामी कुंभमेळा तसेच व्यवसाय आणि नाशिकच्या डिजिटल भविष्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. गेल्या चार वर्षांत यंग इंडिया नाशिकने ३५० हून अधिक कार्यक्रम आयोजित करून तीन लाखांहून अधिक नाशिककरांना प्रभावित केले आहे. तसेच या संस्थेने ४ राष्ट्रीय पुरस्कार जिंकत ४० हून अधिक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. या मधील उद्योजकांसाठी संधी उपलब्ध होणार आहे

डब्ल्यूआरसीएम २०२५ मध्ये भोपाळ, अहमदाबाद, मुंबई, पुणे, गोवा यासह वीसहून अधिक शहरांतील २०० सदस्य सहभागी होत आहेत, ज्यापैकी ९५ टक्के सदस्य हे उद्योजक आहेत. त्यामुळे नेटवर्किंग आणि ज्ञान सामायिकरणाची ही एक उत्तम संधी असेल असल्याचे आयोजकांनी सांगितले. याप्रसंगी बोलताना यंग इंडिया पश्चिम क्षेत्र अध्यक्ष कृणाल शाह म्हणाले,की "ही परिषद सर्जनशीलता, आवड आणि नेतृत्व यांचे मिश्रण आहे. हा कार्यक्रम आम्हा सर्वांना उत्कृष्टतेसाठी प्रेरित करेल." यावेळी पारुल दाधीच, वेदांत राठी, हर्ष देवधर कृणाल शहा आदी उपस्थित होते.

## जागतिक चिमणी दिनानिमित्त केबीएच विद्यालयात चिमण्यांचे चित्र प्रदर्शन

### कला शिक्षक संजय जगताप यांचा कलाविष्कार

**नाशिक ।** येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालय गंगापूर रोड नाशिक येथे जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून विद्यालयाचे कलाशिक्षक संजय जगताप यांनी रेखाटलेल्या चिमण्यांचे चित्र प्रदर्शन प्रदर्शित करण्यात आले.

प्रदर्शनाचे उदघाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पवार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी पर्यवेक्षक धनंजय देवरे ज्येष्ठ शिक्षक नरेंद्र पाटील उपस्थित होते. या प्रसंगी मुख्याध्यापक संजय पवार उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की, नेहमीच मनुष्यप्राण्याच्या सहवासात राहणारा निरागस पक्षी म्हणजे चिमणी... परंतु दुर्दैवाने या काँक्रीटच्या जंगलात चिमणी या पक्षाचा ऱ्हास होताना आपल्याला दिसतोय त्यामुळे चिमण्यांचं




अस्तित्व आपल्या सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून आपली सर्वांची जबाबदारी आहे की चिमणी दिनाचे औचित्य साधून चिमण्यांची संख्या कशी वाढेल यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कलाशिक्षक संजय जगताप यांनी आपल्या कुंचल्यातून वेगवेगळ्या रंगांचा वापर करून ३० ते ३५ चिमण्यांची चित्र रेखाटलेली आहेत यामध्ये चिमण्यांचे वेगवेगळे प्रसंग प्रदर्शित केलेले दिसतात. आपल्या कला-विष्काराबद्दल बोलताना संजय जगताप म्हणाले की आज वातावरणामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास झालेला आपल्याला दिसतोय आणि या कारणामुळे आपल्या नेहमीच सहवासात असलेल्या चिमण्यांची संख्या हळूहळू कमी होताना आपल्याला दिसत आहे. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये याविषयी जनजागृती व्हावी त्यांच्या मनात चिमण्याविषयी एक प्रकारे जिव्हाळा निर्माण व्हावा हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून मी वेगवेगळ्या रंगछटा व प्रसंग विचारात घेऊन चिमण्यांचे चित्र रेखाटलेले आहेत. हे चित्र प्रदर्शन विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी आम्ही आयोजित केले. जगताप यांच्या या उदात्त हेतूचे शाळा व्यवस्थापन विकास समितीच्या अध्यक्षा डॉ. योगिता अपूर्व हिरे, उपाध्यक्षा सुजाता शिंदे त्यांनी कौतुक करून शुभेच्छा दिलेल्या आहेत. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उपशिक्षक संजय बाविस्कर यांनी केले.

## रेल नीर : रेल्वे प्रवाशांसाठी सुरक्षित, गुणवत्तापूर्ण पॅकेज्ड पिण्याचे पाणी

**देवळाली कॅम्प ।** भारतीय रेल्वेने प्रवाशांना उच्च प्रतीच्या आणि सुरक्षित पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. हा विषय अनेकदा संसदेत चर्चिला गेला असून, प्रवाशांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे ही भारतीय रेल्वेची प्राधान्यपूर्ण




जबाबदारी राहिली आहे. या पार्श्वभूमीवर, २००२-२००३ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात निर्णय घेण्यात आला की भारतीय रेल्वे केटरिंग आणि टुरिझम कॉर्पोरेशन (IRCTC) द्वारे 'रेल नीर' ब्रँडचे उत्पादन करण्यात येईल, जेणेकरून रेल्वे स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये उच्च दर्जाचे पॅकेज्ड पिण्याचे पाणीच उपलब्ध होईल.


रेल्वे प्रवाशांसाठी 'रेल नीर' हे अधिकृत पॅकेज्ड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश प्रवाशांना गुणवत्तापूर्ण आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवणे हा आहे. 'रेल नीर' पाण्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी ते अत्याधुनिक तंत्रज्ञानाने तयार करण्यात येते. आयआरसीटीसी द्वारे ठरवलेल्या कठोर निकषांनुसार प्रत्येक बाटलीची निर्मिती केली जाते, जेणेकरून प्रवाशांना शुद्ध, सुरक्षित आणि ताजे पाणी मिळू शकेल. रेल नीरच्या गुणवत्तेची नियमितपणे तपासणी केली जाते. प्लांट स्तरावर तसेच रेल्वे स्थानकांवर नियुक्त आरोग्य निरीक्षकांमार्फत या पाण्याचे नमुने वेळोवेळी तपासले जातात. प्रवाशांकडून जर 'रेल नीर' च्या गुणवत्तेबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली, तर त्वरित त्याचे नमुने घेऊन प्रयोग शाळेत चाचणी केली जाते. कधीकधी जवळच्या रेल नीर प्लांटमधून पुरवठा खंडित झाल्यास, इतर प्लांटमधून 'रेल नीर' च्या बाटल्यांची व्यवस्था केली जाते किंवा रेल्वे प्रशासनाद्वारे मंजूर केलेल्या इतर ब्रँडच्या पिण्याच्या पाण्याच्या विक्रीस परवानगी दिली जाते. रेल नीर' हा उपक्रम भारतीय रेल्वेच्या प्रवाशांच्या आरोग्य आणि सुरक्षेच्या प्रति बांधिलकीचे प्रतीक असून, प्रवाशांना स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी पुरवण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

## लासलगावला देवगिरी, शालिमार, जनता एक्सप्रेसचे थांबे पूर्ववत सुरू करा

### रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुंबई विभागाचे मुख्य व्यवस्थापक धर्मवीर मीना यांना पत्र

**नाशिक ।** कोविड १९ च्या कार्यकाळात लासलगाव रेल्वे स्थानकात देवगिरी, शालिमार व जनता एक्सप्रेसचे थांबे बंद करण्यात आले होते. हे थांबे पुन्हा पूर्ववत करण्यात यावेत, अशी मागणी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव व मुंबई विभागाचे मुख्य व्यवस्थापक धर्मवीर मीना यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

भुजबळ यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, लासलगाव येथे आशिया खंडातील सर्वात मोठे कांद्याचे मार्केट आहे. या मार्केटमधून देशभरात तसेच परदेशात विविध ठिकाणी कांदा निर्यात केला जातो. यासाठी लासलगाव रेल्वे स्थानकातून मोठ्या प्रमाणात कांद्यासह शेतमालाचे रॅक भरले जातात. त्याचप्रमाणे या रेल्वे स्थानकातून मोठ्या संख्येने प्रवासी वाहतूक देखील होते. लासलगाव कांदा बाजारभाव हा एक बेंचमार्क म्हणून काम करतो, जो संपूर्ण आशियाई बाजारपेठेत कांद्याच्या किमतींवर परिणाम करतो. ३१ मार्च २०१६ रोजी केंद्र सरकारच्या अंतर्गत भौगोलिक संकेत नोंदणीकडून लासलगाव कांद्याला भौगोलिक संकेत (जीआय) दर्जा क्रमांक २५८ प्रदान करण्यात आला. तथापि, कोविड पुनरुज्जीवनानंतर लासलगाव (LS) येथे १७०५७/१७०५८ देवगिरी एक्सप्रेस, १८०२९/१८०३० शालीमार एक्सप्रेस आणि १३२०१/१३२०२ जनता एक्सप्रेसचा व्यावसायिक थांबा अचानक रद्द करण्यात आला. ज्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि प्रवाशांना मोठा त्रास



होत आहे. लासलगाव एपीएमसी मार्केटमध्ये येत आहेत. मिशन ३००० मेट्रिक टन अंतर्गत एक्सपोनेन्शियल किसान रेल्वे कांदा लोडिंग प्रदान करूनही, लासलगाव (एलएस) उत्तर भारत आणि लगतच्या व्यावसायिक जिल्ह्यांशी जोडण्यापासून वंचित आहे, ज्यामुळे मतदारसंघातील शेतीची समस्या वाढत आहे, ज्यासाठी तुमच्या तातडीने हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. या गाड्या पुन्हा नियमित सुरू करण्याची प्रवासी वर्गाची मागणी आहे. मतदारसंघातील प्रवाशांना प्रवासासाठी लासलगाव (LS) येथे १७०५७/१७०५८ देवगिरी एक्सप्रेस, १८०२९/१८०३० शालिमार एक्सप्रेस आणि १३२०१/१३२०२ जनता एक्सप्रेसच्या व्यावसायिक थांबे पूर्ववत करण्याची तातडीने आवश्यकता आहे. हे थांबे पूर्ववत सुरु करा अशी मागणी भुजबळ यांनी केली आहे.

## महत्त्वाचे

### गायक अनुप जलोटा यांची रंगली भजन संध्या


**त्र्यंबकेश्वर ।** त्र्यंबकेश्वर येथे पद्मश्री प्रसिद्ध भजन सम्राट अनुप जलोटा यांचा भजन संध्या



कार्यक्रम झाला. भजन सम्राट अनुप जलोटा यांना यानिमित्ताने साधू महंत यांच्या सत्संगाचा लाभ देखील घेता आला. यावेळी त्यांनी अन्नपूर्णा माता मंदिरात त्यांनी दर्शन घेतले. तसेच अभिनव ग्रुपच्या कार्यक्रमात दीपपूजन केले. यावेळी साधू महंत त्यांच्या समावेत होते. त्यामुळे भजन संध्येचा आनंद अधिकच वाढला. अन्नपूर्णा आश्रमाचे ठाणापती महंत दिव्यानंद महाराज, स्वामी जयेन्द्रानन्द गिरिजी महाराज, स्वामी श्री कृष्णबोधनंद गिरीजी पुजारी शर्मा यांनी अनुप जलोटा यांना आशीर्वाद दिले. महामंडलेश्वर गणेशानंद सरस्वती महाराज, अभिनव ग्रुपचे अध्यक्ष रतीश (बापू) दशपुत्र तसेच सहकारी यावेळी उपस्थित होते.

### चांदशीत हास्य क्लबतर्फे रंगपंचमी सण उत्साहात

**नाशिक ।** चांदशी येथे नंदनवन हास्य क्लब तसेच सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघातर्फे स्वतंत्ररित्या रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सदस्यांनी एकमेकांवर रंगांची उधळण



केली. रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण, जिथे लोक एकमेकांना रंग लावून आनंद साजरा करतात. या सणाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे, आणि तो नकारात्मक उर्जेवर विजय दर्शवतो,असे हास्य क्लब चे ज्येष्ठ सदस्य अनिल धटिंगण, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विजय बिरारी आणि शरद मंडलिक यांनी सांगितले. बी.बी.मोरे,शंकरराव खरात, विनय भुसे, प्रियदर्शन टांकसाळे, कमल उगले, मीरा पाटील, अनुराधा देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले.अर्चना टांकसाळे आणि मृदुला वझे यांच्या गायनाने या सणाला आगळी रंगत आली.

### मानूर वळणावर अपघाताचा धोका

**कळवण ।** कळवण-नाशिक रोडवर असलेल्या मानूर गांवाच्या वळणावर वाहनांची रोजच वर्दळ होत असते. यामुळे मानूर वळणावर



वाढलेल्या वाहनांच्या भाऊगर्दीने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे सर्वसामान्य नागरिकांना व वाहन-चालकांना वळणावर नेहमीच त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित यंत्रणेने गतिरोधक टाकावेत, अशी मागणी वाहनचालक, स्थानिक नागरिकांनी केली आहे. कळवण-नाशिक रोडवर या वळणावर नेहमीच होत असलेल्या अपघातांमुळे गरजेच्या ठिकाणी गतिरोधक, दिशादर्शक फलक व रात्रीच्या वेळी रिफ्लेक्टर टाकण्याची सातत्याने मागणी वाहनचालक व स्थानिक करत असतात. त्यातच अपघातांचा सर्वाधिक धोका आता मानूरचा वळण रस्ता बनला आहे. या ठिकाणावरून श्रीक्षेत्र सप्तशृंगी गडावर जाणाऱ्या भाविकांची वाहनेदेखील याच वळणावरून जात असतात. यामुळे सप्तशृंगी गडावर येणारे, भाविकांची वर्दळ या वळण रस्त्यावरून दररोज हाजोराच्या संख्येने वाहने ये जा करत असतात. वाहनांचा अति वेग असतानां अनेक छोटे-मोठे अपघात देखील झाले आहेत. भविष्यात अपघात झाल्यास त्यास जबाबदार कोण?असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### परप्रांतीय ट्रकचालकाची पोलिसांना मारहाण

**नाशिक ।** मुंबईहून धुळ्याकडे जाणाऱ्या राजस्थानमधील ट्रक चालकाने नो एंट्री मार्गावर वाहन घुसविल्यानंतर या गोष्टीचा जाब विचारणाऱ्या एका पोलिसास मारहाण आणि इतर पोलिसांना शिवीगाळ केल्याची घटना रविवारी घडली. या प्रकरणी संबंधित ट्रकचालक आणि ट्रकचा क्लीनर यांच्या विरोधात मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर पोलीस वाहतूक शाखेचे युनिट दोनचे कर्मचारी अल्लाउद्दीन लतीफ शेख (वय 56) राहणार देवळाली गाव हे द्वारका सर्कल हे कर्तव्य बजावत असताना सफेद व केशरी रंगाच्या ट्रकमधील (पीबी झिरो पाच ए एम १४९०) चालक पर्वत किरपालसिंग (वय ४९) राहणार फिरोजपुर आणि क्लिनर मनप्रीत सिंग गिदर सिंग (२५) राहणार मकु शहर यांनी नो एन्ट्रीमध्ये वाहन घातले याबद्दल अल्लाउद्दीन शेख यांनी वाहनचालकास दंड केला. त्यामुळे ट्रकचालकाने शेख यांच्या छातीवर बुक्का मारला. याप्रकरणी चालक, क्लीनर दोघांवर ही मुंबई नाका पोलिसांनी मोटर वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.



# सेन्सेक्सने घेतली 900 अंकांची उसळी



सेन्सेक्स 76,348

निफ्टी 23,190

मुंबई, दि.२० प्रतिनिधी

शेअर बाजारात आज सलग चौथ्या दिवशी मोठी वाढ झाली. सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही 1 टक्क्यांहून अधिक वाढले. सेन्सेक्स 900 अंकांच्या वाढीसह बंद झाला. तर निफ्टी 23,200 च्या जवळ बंद झाला. यामुळे आज शेअर बाजारात गुंतवणूकदारांना साडेतीन लाख कोटी रुपयांचा नफा झाला. आयटी आणि टेलिकॉम शेअर्समधील तेजीने बाजार वधारले.

सर्व क्षेत्रीय निर्देशांक वधारून बंद झाले. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक 0.73 टक्क्यांपर्यंत वाढून बंद झाले. यूएस फेडरल रिझर्व्हने वर्षाच्या अखेरीस दोनदा व्याजदरात कपात करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आज गुंतवणूकदारांचा उत्साह कायम राहिला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स 899.02 अंकांनी वाढून 76,348.06 वर बंद झाला. तर निफ्टी 283.05 अंकांच्या वाढीसह 23,190.65 वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज 20 मार्च रोजी 408.48 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे, जे त्याच्या आधीच्या ट्रेडिंग दिवशी म्हणजे बुधवार 19 मार्च रोजी 405 लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप आज सुमारे 3.48 लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत 3.48 लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

सेन्सेक्समधील 30 पैकी 27 शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये भारती एअरटेलच्या शेअर्समध्ये सर्वाधिक 4.17 टक्के वाढ झाली आहे. यानंतर टायटन, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस), हिंदुस्थान युनिलिव्हर (एचयूएल) आणि इन्फोसिसचे शेअर्स 1.74 टक्क्यांपासून 3.47 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले.

सेन्सेक्सचे केवळ तीन शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. इंडसइंड बँकेचे शेअर्स 1.23 टक्क्यांनी घसरले. तर बजाज फायनान्स, अल्ट्राटेक सिमेंटचे शेअर्स 0.15 ते 0.66 टक्क्यांपर्यंत घसरले.

# पिंपरी चिंचवड जळीतकांड..!

# दिवाळीत पगार कापल्याने चालकानेच टेम्पो ट्रॅव्हलरला लावली आग

पुणे, दि. २० प्रतिनिधी

हिंजवडीतील व्योम ग्राफिक्स या 'आयटी' कंपनीतील कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या मिनी बसला (टेम्पो ट्रॅव्हलर) अचानक आग लागून चौघांचा होरपळून मृत्यू झाला, तर सहाजण जखमी झाले. पुढील बाजूस बसलेले कर्मचारी आणि चालक पेटत्या बसमधून बाहेर पडले, मात्र मागील दरवाजा उघडला न गेल्याने अडकून पडलेल्या चौघांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. फेज एकमधील विप्रो सर्कलजवळ बुधवारी सकाळी आठच्या सुमारास ही घटना घडली होती. या घटनेच्या पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात नसून घात असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. चालकाने केमिकल आणून सीट खाली ठेवून भडका घडवून आणला असल्याची माहिती समोर येत आहे. फेज १ मध्ये एकेरी वाहतूक रस्ता सुरू झाल्यावर त्याने काडी पेटवून आग लावली आणि केमिकलचा भडका उडाला. भडका उडण्यापूर्वी तो गाडीतून उतरला होता. चालकाचा दिवाळीत पगार कापला होता. तर गाडीतील सह कर्मचारी यांनी त्रास दिला होता म्हणून त्याने हे सर्व घडवून आणल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. ट्रॅव्हल्सला आग लागली नाही तर चालकाने गाडी पेटवल्याचं तपासात निष्पन्न झालंय त्यामुळं चौघांचा जीव घेतल्याप्रकरणी अन पाच जणांचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चालक जनार्दन हंबर्डीकर गुन्हा दाखल करण्यात आलाय.



## बेंझिन केमिकल आणले, वारजेतून काडीपेटी घेतली

पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, वरिष्ठ पोलिस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी माहिती दिली. त्यात घातपात असल्याचे उघड झाले आहे. विशाल गायकवाड म्हणाले, 'अपघात झाल्यानंतर पोलिसांनी आग कशामुळे लागली. याचा तपास सुरु केला. त्यावेळी शॉर्ट सर्किटने आग लागली नसल्याचे आढळून आहे. मग कामगारांशी आणि कंपनीत चौकशी केली त्यावेळी धक्कादायक माहिती समोर आली. कामगारांशी असलेला वाद आणि दिवाळीमध्ये बोनस न दिल्याने आणि वेतन कापल्याच्या रागातून बस चालक जनार्दन हंबर्डीकर याने बस पेटवून दिली आहे, अशी माहिती उघड झाली आहे. नियोजनबद्द कट रचून त्याने हा प्रकार केला आहे. आरोपीने कंपनीतून आदल्या दिवशी बेंझिन नावाचे केमिकल गाडीत आणून ठेवले. तसेच वारजे येथून काडेपेटी घेतली होती. तसेच टोनर पुसण्यासाठी लागणाऱ्या चिंध्याही गाडीतील सीट खाली आणून ठेवल्या होत्या. हिंजवडीजवळ आल्यावर कंपनी काही अंतरावर असताना त्याने काडीपेटीची काडी पेटून चिंध्या पेटवल्या, उडी मारली. केमिकलमुळे बसमध्ये आगीचा भडका उडाला. हंबर्डीकर यांचे कंपनीतील त्यांच्या सहकाऱ्यांशी सतत वाद होत होते. दररोजच्या प्रवासातील समस्या आणि सहकारी कर्मचाऱ्यांशी वैयक्तिक संघर्षांमुळे तणाव वाढत असल्याचे इतर कर्मचाऱ्यांनी पोलिसांनी केलेल्या तपासात आढळले. हंबर्डीकर याने काडी पेटवून रासायनिक स्फोट घडवून गाडीला आग लावली. स्फोट होण्यापूर्वीच चालक गाडीतून बाहेर उडी मारली होती.

## यांचा गेला नाहक बळी

वाहन पेटवून झालेल्या अपघात सुभाष सुरेश भोसले (वय ४२, रा. वारजे), शंकर शिंदे (५८, रा. नऱ्हे), गुरुदास लोकरे (४०, रा. हनुमाननगर, कोथरूड), राजू चव्हाण (४०, वडगाव धायरी) यांचा मृत्यू झाला तर, जनार्दन हुंबर्डेकर (चालक, ५७, रा. वारजे), संदीप शिंदे (३७, रा. नऱ्हे), विश्वनाथ जोरी (५२, रा. कोथरूड), विश्वास लक्ष्मण खानविलकर (पुणे), प्रवीण निकम (३८), चंद्रकांत मलजी (५२, रा. दोघेही कात्रज) जखमी झाले. विश्वास कृष्णराव गोडसे, मंजिरी आडकर, विठ्ठल दिघे, प्रदीप बाबुराव राऊत बसमधून सुखरूप बाहेर पडले होते.

# इस्रायलचा पुन्हा गाझावर हवाई हल्ला, 58 पॅलेस्टिनी ठार

गाझा, दि. २० वृत्तसंस्था

इस्रायलने आज पहाटे गाझा पट्टीवर केलेल्या हवाई हल्ला केला. यामध्ये किमान ५८ पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले आहेत, असे गाझामधील आरोग्य मंत्रालयाच्या हवाल्याने वृत्त आहे. दरम्यान, ताज्या हल्ल्यांवर इस्रायली सैन्याकडून त्वरित कोणतीही माहिती जारी करण्यात आलेली नाही.

बुधवारी रात्री उशिरा आणि गुरुवारी पहाटे इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान ५८ पॅलेस्टिनी ठार झाले. मध्यरात्री अनेक घरांवर हल्ला झाला. पुरुष, महिला आणि मुले झोपेत असताना मृत्युमुखी पडल्याचे गाझामधील आरोग्य मंत्रालयाच्या सूत्रांनी म्हटले आहे.

मंगळवार, दि. १८ मार्च रोजी युद्धविराम मोडत काढत इस्रायलने गाझा पट्टीवर हवाई हल्ला केला होता. गाझाच्या आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, मंगळवारीच ४०० हून अधिक पॅलेस्टिनी ठार झाले, ज्यात बहुतेक महिला आणि मुले होती. हमानसे स्वाक्षरी केलेल्या करारापासून दूर जाणाऱ्या नवीन प्रस्तावाला नकार दिल्याचा दावा करत इस्रायलने हमासवर पुन्हा एकदा झालेल्या युद्ध लादल्याचा आरोप केला आहे.

आम्ही फक्त हमासच्या दहशतवाद्यांना लक्ष्य करत असल्याचा दावा इस्रायलचे लष्कर करत आहे. तर या हवाई हल्ल्यांमध्ये महिला आणि मुले मृत्युमुखी पडत असल्याचा दावा पॅलेस्टिनकडून केला जात आहे. दरम्यान, अमेरिका, इजिप्त आणि कतार यांच्या मध्यस्थीनंतर जानेवारी २०२५मध्ये झालेल्या युद्धबंदी करारात सांगितल्याप्रमाणे, कायमस्वरूपी युद्धबंदी आणि गाझामधून संपूर्ण इस्रायली माघार घेण्याच्या बदल्यातच हमास उर्वरित ओलिसांना सोडेल असे म्हटले आहे.

# केंद्रीय मंत्र्यांच्या भाच्यांनी एकमेकांवर केला गोळीबार, एकाचा मृत्यू

पाटणा, दि. २० वृत्तसंस्था

मागच्या काही दिवसांपासून बिहारमध्येगुन्हेगारीच्या वाढत्या घटना समोर येत असतानाच नरेंद्र मोदींच्या सरकारमध्ये मंत्री असलेल्या नित्यानंद राय यांच्या बहिणीच्या कुटुंबात धक्कादायक घटना घडली आहे. नित्यानंद राय यांच्या भाच्यांनी किरकोळ कारणांवरून झालेल्या भांडणानंतर एकमेकांवर गोळीबार केला. या गोळीबारात राय यांच्या एका भाच्याचा मृत्यू झाला असून, दुसरा भाचा आणि बहीण जखमी झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना नवगछिया येथील पोलिसांनी सांगितले की, आपपसातील वादामुळे दोन्ही भावांनी एकमेकांवर गोळीबार केला. पाण्यावरून दोन्ही भावांमध्ये वाद झाला होता. त्यानंतर विश्वजित आणि जयजीत यांनी एकमेकांवर गोळीबार केला. यात विश्वजित आणि जयजीतसह त्यांची आई हिना देवी ही जखमी झाली. पैकी विश्वजित याचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. तर जयजीत आणि हिना देवी यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विश्वजित आणि जयजीत हे केंद्रीय मंत्री नित्यानंतर राय यांचे भाचे आहेत. तर हिना देवी ही राय यांची बहीण आहे. मृत विश्वजित आणि त्याचा भाऊ जयजीत यादव हे नवगछिगा येथील जगतपूर गावामध्ये एकाच कुटुंबामध्ये राहत होते. तसेच दोघेही शेती करून आपला उदरनिर्वाह चालवायचे. दरम्यान, नळाच्या पाण्यावरून दोघांमध्ये वाद झालला. त्यानंतर त्यांनी एकमेकांना धक्काबुक्की केली. यादरम्यान, जयजीत याने विश्वजितवर गोळीबार केला. तर विश्वजितनेही जयजीतवर गोळ्या झाडल्या. यावेळी या दोघांची आई हिना देवी हिलाही गोळी लागून ती जखमी झाली. या तिघांनाही रुग्णालयात नेत असताना विश्वजीत याचा वाटेतच मृत्यू झाला. तर जयजीत हा उपचार घेत आहे. भाजपा आमदार डॉ. एन. के. यादव यांच्या रुग्णालयात हिना देवी आणि जयजीत यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर पोलिसांनी मृत विश्वजित याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

# सुशांत सिंह राजपूतच्या वडीलांनी केला धक्कादायक दावा

नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था

सुमारे पाच वर्षांपूर्वी कोरोना विषाणू राज्यात धुमाकूळ घालत असतानाच जून २०२० मध्ये आठवडाभराच्या अंतराने झालेल्या दोन संशयास्पद आत्महत्या प्रकरणांमुळे महाराष्ट्राचं राजकारण ढवळून निघालं होतं. बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी मॅनेजर दिशा सालियान हिने आत्महत्या केल्यानंतर आठवडाभरातच १४ जून २०२० रोजी सुशांत सिंह राजपूत हाही त्याच्या घरामध्ये मृतावस्थेत सापडला होता. दरम्यान, या दोन्ही मृत्यूंमागच्या कारणांचा उलगडा अद्याप झालेला नाही. त्यातच दिशा सालियान हिच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायायालयात याचिका दाखल करत माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्या विरोधात गंभीर आरोप केल्याने या प्रकरणाची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहेत. त्यापाठोपाठ आता सुशांत सिंह राजपूत याचे वडील के. के. सिंह यांनीही त्यांच्या मुलाच्या मृत्यूबाबत धक्कादायक दावा केला आहे. तसेच दिशा आणि सुशांत सिंह राजपूत यांच्या मृत्यूमागे काहीतरी कडी असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

के. के. सिंह म्हणाले की, सुशांत सिंह राजपूत आणि दिशा सालियान यांच्या मृत्यूप्रकरणाचा योग्य पद्धतीने तपास व्हायला पाहिजे. तेव्हा आम्ही पाटण्याला होतो. तेव्हा आम्ही जे ऐकलं होतं, त्यानुसार दिशा सालियानचा अपघात झाला होता. हा अपघात असल्याचं दर्शवण्यात आलं होतं. मात्र तिला प्रत्यक्षात इमारतीवरून खाली ढकलण्यात आलं होतं. ती सुशांतची माजी मॅनेजर होती, आम्ही हेच ऐ कलं आहे.

सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबाबत ते पुढे म्हणाले की, सुशांत टोकाचं पाऊल उचलून जीवन संपवणारा व्यक्ती नव्हता. त्याचा मृत्यू होण्यापूर्वी आठवडाभर आधी मी त्याच्याशी बोललो होतो. त्याच्या बोलण्यावरून तो असं काही करेल असं वाटलं नव्हतं. दरम्यान, या प्रकरणात काही सबळ निष्कर्ष हाती येत नाही तोपर्यंत न्याय झाला, असं कसं म्हणता येईल, असा सवालही त्यांनी सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यू प्रकरणाच्या तपासाबाबत उपस्थित केला. सुशांतचे वडील पुढे म्हणाले की, आता राज्यातील सरकार बदललं आहे. तसेच सध्याच्या सरकारवर आमचा पूर्ण विश्वास आहे. आधीच्या महाविकास आघाडी सरकारमधील पोलिसांनी या प्रकरणाच योग्य पद्धतीने तपास केला नव्हता. तेव्हा ते पोलीस कुणाच्या दबावाखाली होते, हे माहिती नाही. मात्र आता सरकार बदललं आहे. त्यामुळे सध्याचं प्रशासन आणि मुख्यमंत्र्यांवर आमचा पूर्व विश्वास आहे. ते जे काही करतील ते योग्य करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# 'अशी ही जमवा जमवी' सिनेमाचा धमाल टीझर रिलीझ




सिनेरंग

मैत्री, प्रेम, कुटुंब या विषयांवर आजवर बरेच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत; मात्र राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटात फक्त तरुणांचीच नाही तर वृद्ध मित्र मैत्रिणींचीसुद्धा एक धमाकेदार कहाणी आपल्याला अनुभवयाला मिळणार आहे. या दमदार आणि बहुप्रतीक्षित चित्रपटाचं टिझर प्रदर्शित झालंय, ज्यात अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या दोन दिग्गजांची मजेदार जुगलबंदी पहायला मिळते. चित्रपटाचं नाव आणि रिलीझ झालेल्या टिझरवरून संपूर्ण सिनेमा पाहण्याची प्रेक्षकांची उत्सुकता आता वाढली आहे.

थोडी खट्याळ, थोडी गोंडस, थोडी हळवी अशी चित्रपटाची कथा असून आजच्या तरुणाईसोबत प्रौढांनाही भावणारा, मनोरंजक आणि नवीन विचार मांडणारा हा सिनेमा आहे. अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या अनुभवी कलाकारांसोबत सिनेमात सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर, ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे अशा लोकप्रिय कलाकारांची फौज आहे. भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान देणारे चित्रपती व्ही. शंताराम यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव राहुल शांताराम यांनी मनोरंजनविश्वात सिनेप्रेमींसाठी काहीतरी नवीन घेऊन येण्याचे उद्दिष्ट ठेवत 'राजकमल एंटरटेनमेंट' ही नवीन कंपनी सुरू केलेली आहे. प्रेमाची ही नवी कहाणी कशी जमणार आहे, हे जाणून घेणं औत्सुक्याचं ठरणार आहे. 'राजकमल एंटरटेनमेंट'चा हा नवाकोरा चित्रपट १० एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या सिनेमागृहात भेटीला येणार आहे.

# धर्मा प्रॉडक्शन्स कृत 'ये रे ये रे पैसा 3'

लोकरंजन

धमाल मनोरंजन आणि विनोदाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या 'ये रे ये रे पैसा' आणि 'ये रे ये रे पैसा २' या सुपरहिट चित्रपटांच्या प्रचंड यशानंतर, आता या फ्रँचायझीचा तिसरा भाग म्हणजेच 'ये रे ये रे पैसा ३' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा दमदार टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून त्याला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. येत्या १८ जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. वैशिष्ट्य म्हणजे, बॉलिवूडला एकाहून एक जबरदस्त चित्रपट देणारे धर्मा प्रॉडक्शन्स आणि एव्हीके पिक्चर्स पहिल्यांदाच एकत्र येत असून धर्मा प्रॉडक्शन्स या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे. त्यामुळे आधीच भव्य असणाऱ्या या चित्रपटाची भव्यता आता आणखीनच वाढणार आहे.

पुन्हा एकदा अण्णा, आदित्य, बबली आणि सनी एकत्र आल्याने मोठा धमाका उडणार असल्याचे दिसतेय. एकंदरच टीझर पाहाता यावेळचा धमाका तिप्पट असणार हे नक्की ! 'ये रे ये रे पैसा ३' मध्ये पाच करोडचा घोळ आणि त्यात आलेले नवीन ट्विस्ट काय असतील, हे प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच समजेल. धर्मा प्रॉडक्शन्स, अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर ॲरो यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून संजय जाधव दिग्दर्शित या चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.




# श्रेयस तळपदेचा नवा शो 'चल भावा सिटीत' झी मराठीवर

टेलीरंग

'चल भावा सिटीत' ह्या बहुचर्चित शोच्या एका प्रोमोमध्ये एक व्यक्ती पाठमोरी चालताना दिसते, ज्यावर कॅप्शन असं होते कि - ' तो येतोय शो गाजवायला! कोण बरं असेल तो? कंमेंट्समध्ये सांगा!' यावर अनेक युजर्सनी 'श्रेयस तळपदे' अशी कमेंट केली. मनोरंजन विश्वातील अत्यंत लोकप्रिय अभिनेता 'श्रेयस तळपदे' पुन्हा एकदा झी मराठीवर आणि छोट्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. त्यांच्या फॅन्ससाठी ही एक आनंदाची बातमी आहे, कारण झी मराठीच्याच 'माझी तुझी रेशीमगाठ' या सुपरहिट मालिकेतील यश-नेहा जोडी खूप गाजली होती. पण यावेळी श्रेयस 'चल भावा सिटीत' या नवा रिॲलिटी शोचा होस्ट म्हणून दिसणार आहे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाने शो मध्ये रंग भरताना दिसणार आहे. या कार्यक्रमाचं भन्नाट शीर्षकगीत नुकतंच झी मराठीच्या ऑफिशिअल इंस्टाग्राम पेजवर रिलीज करण्यात आलं, याच शीर्षकगीतातील श्रेयसची हुक स्टेप आणि श्रेयसचा लुक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. या शोमध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील स्पर्धक एकत्र येणार असून, स्पर्धकांना अश्या आव्हानांना सामोरे जावे लागेल जिथे त्यांना आपल्यापेक्षा संपूर्णपणे वेगळं जीवन जगणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधण्यास प्रवृत्त करेल. ग्रामीण आणि शहरी भागातले स्पर्धक एकमेकांच्या जीवनाचा अनुभव घेतील, आणि त्यांना आव्हान देतील.



चल भावा सिटीत हा कार्यक्रम प्रेक्षकांना ग्रामीण महाराष्ट्राची समृद्धी आणि संस्कृती दर्शवेल. सिटीत गाव गाजणार म्हणजे नक्की काय होणार हे प्रेक्षकांना हळू हळू उलगडत जाईलच. अशी एक अफलातून संकल्पना जिचा प्रेक्षकांनी विचार सुद्धा केला नसेल आता तुम्हाला पाहायला मिळेल आपल्या लाडक्या झी मराठीवर. प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारा आणि मनोरंजनाचे रंग उधळणारा नवा कार्यक्रम 'चल भाव सिटीत' १५ मार्चपासून दररोज रात्री ९.३० वा. फक्त आपल्या झी मराठीवर पहा.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# कुठल्याही प्रशिक्षणाशिवाय 59 वर्षीय महिलेने सर केले एव्हरेस्ट

तिरुवनंतपुरम, दि. २० वृत्तसंस्था

केरळमधील एका ५९ वर्षीय महिलेने जगातील सर्वाच उंच एव्हरेस्ट हे शिखर सर केलं आहे. विशेष म्हणजे त्यांनी यासाठीचं कोणतंही अधिकृत प्रशिक्षण घेतलेलं नाही. त्यांनी केवळ यूट्युबवरील व्हिडीओ पाहून स्वतःची तयारी केली होती. वासंती चेरुवीत्तील असं या महिलेचं नाव आहे. इंटरनेटवरील माहिती व यूट्युबवरील व्हिडीओ पाहून घेतलेल्या प्रशिक्षणाच्या आधारे केलेली तयारी, हिंमत आणि ५९ वर्षीसुद्धा कायम असणाऱ्या उत्साहाच्या जोरावर त्यांनी जगातलं सर्वात उंच शिखर सर केलं आहे. एव्हरेस्टवर चढाई करण्याचं त्यांचं अनेक वर्षांचं स्वप्न होतं जे त्यांनी पूर्ण केलं आहे.




एव्हरेस्ट हे शिखर सर करणं तरुणांसाठी देखील खूप अवघड ठरतं. त्यासाठी अनेकजण प्रशिक्षणही घेतात. मात्र, ५९ व्या वर्षी, कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय ही कामगिरी करणं खूपच कौतुकास्पद आहे. एव्हरेस्टवर गिर्यारोहण करण्यासाठी वासंती यांनी स्वतःला पूर्णपणे सज्ज केलं होतं. गिर्यारोहणाशी संबंधित व्हिडीओ पाहून तयारी केली होती.

वासंती यांनी १५ फेब्रुवारी रोजी चढाईला सुरुवात केली होती. नेपाळमधील सुर्के येथून त्यांनी त्यांची मोहीम सुरू केली. २३ फेब्रुवारी रोजी त्या बेस कॅम्पवर दाखल झाल्या. ही कामगिरी पूर्ण करण्यासाठी ५९ वर्षीय वासंती यांनी केवळ यूट्युबवरील व्हिडीओ पाहून तयारी केली होती.

थलिप्परमबाइन येथील ५९ वर्षीय वासंती यांनी इंटरनेटवर उपलब्ध माहिती, यूट्युबवरील व्हिडीओ पाहून प्रशिक्षण घेतलं. त्या म्हणाल्या, "मी दररोज सकाळी तीन तास चालायचे, ट्रेकिंग शूज परिधान करून बराच वेळ सराव करायचे. माझ्या मित्रांबरोबर संध्याकाळी ५ ते ६ तास चालायचे. मी जेव्हा माझ्या मित्रांना सांगितलं की मला एव्हरेस्ट शिखर सर करायचं आहे म्हणून मी हा सराव करतेय, तेव्हा माझ्या मित्रांना यावर विश्वास बसायचा नाही.

एव्हरेस्ट प्रवासादरम्यान वासंती या जगभरातील अनेक गिर्यारोहकांना भेटल्या. चढाई करताना अनेक अडथळे येत होते, निमुळत्या वाटा, खोल दऱ्यांसह अनेक अडचणी बाजूला करून त्या दररोज पाच ते सहा तास चढाई करत होत्या. बऱ्याचदा मोठी विश्रांती घ्यायच्या. याबाबत वासंती यांनी सांगितलं की "मला जास्त वेळ हवा होता. मी बऱ्याचदा हळू चालायचे, माझ्याबरोबरचे लोक पुढे जायचे. मी मोठी विश्रांती घ्यायचे. माझ्याकडे एक छडी होती, मला तिचाच आधार होता. काही पावलं चालल्यानंतर मी थांबायचे पाच ते सहा वेळा श्वास घ्यायचे. जेणेकरून मला कमी थकवा येईल."

# एपीएमसीमध्ये द्राक्षांचे भाव वधारले

## द्राक्षांच्या निर्यातीवर देखील परिणाम

नवी मुंबई, दि. २० प्रतिनिधी

द्राक्षाचे उत्पादन कमी झाल्यानं मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये (एपीएमसी) द्राक्षाचे भाव वाढलेले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जवळपास 40 टक्के द्राक्षाच्या उत्पादनात घट पाहायला मिळत आहे. त्याचाच परिणाम द्राक्षांच्या किंमतीवर झाला. यंदा खवय्यांसाठी द्राक्ष किंमतीच्या तुलनेत आंबट लागणार आहेत.

खराब आणि ढगाळ वातावरणाचा द्राक्षांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. सुरुवातीपासूनच पाऊस फार मोठ्या प्रमाणात पडल्यानं आणि ढगाळ वातावरण मोठया प्रमाणात असल्यानं द्राक्षाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात घटले आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा 40 टक्के द्राक्षाचे उत्पादन कमी झाले आहे. त्यामुळं यंदा द्राक्षाला चांगला बाजार भाव मिळत आहे. द्राक्षाची फार मोठ्या प्रमाणात भारतातून निर्यात होते, ही निर्यात युरोप तसेच आखाती देशातमध्ये होते. जवळपास 20 हजार कंटेनर एपीएमसीमधून निर्यात होतात. मात्र, कमी उत्पादनामुळं या निर्यातीवर देखील चांगला परिणाम झाला आहे.

ढगाळ वातावरणामुळं द्राक्षांचे कमी उत्पादन निघाल्यानं, द्राक्षाला चांगला बाजार भाव मिळत आहे. 100 ते 150 रुपये किलो असा घाऊक बाजारात द्राक्षाला बाजार भाव मिळत आहे. दरवर्षी द्राक्षाचे शंभर टेम्पो मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत येत होते. आता फक्त तीस ते पस्तीस टेम्पो द्राक्षाचे बाजारात येत आहेत. घाऊक बाजारात वाढलेले द्राक्षांचे भाव पाहता किरकोळ बाजारात देखील हे भाव वाढलेले पाहायला मिळणार आहेत. त्यामुळं खवय्यांना किंमती वाढल्यानं द्राक्ष आंबट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# हापूस आंब्याची आवक वाढली; दरही उतरले

नवी मुंबई, दि. २० प्रतिनिधी

वाशीतील एपीएमसी मार्केटमध्ये हापूस आंब्यांची आवक वाढलीय. त्यामुळं खवय्यांना आंब्याचा आस्वाद घेता येणार आहे. वातावरणात उष्मा वाढल्यानं आंब्यांची तोडणी लवकर केल्यानं बाजारात हापूसच्या पेट्या दाखल झाल्या आहेत. अशातच आंबा प्रेमींसाठी वाढलेली हापूसची आवक एक पर्वणीचं ठरणार आहे. एपीएमसी मार्केटमध्ये हापूस आंब्यांची आवक वाढलीय. गेल्या सोमवारी जवळपास 12 हजार हापूस आंब्यांच्या पेट्या एपीएमसी मार्केटमध्ये दाखल झाल्या होत्या. त्याच्यात बुधवारी अचानक वाढ झाली व जवळपास 20 ते 26 हजार हापूस आंब्यांच्या पेट्या एपीएमसी मार्केटमध्ये दाखल झाले आहेत. तसंच आज, गुरुवारी देखील जवळपास 20 ते 25 हजार पेट्यांची बाजारात आवक झालीय. त्यामुळं आंब्यांचे बाजार भाव सध्या उतरलेले पाहायला मिळतायेत. एक एप्रिलपासून हापूस आंब्याचा हंगाम मोठ्या प्रमाणात सुरू होणार आहे. सध्या हापूस आंब्याच्या एका पेटीला जवळपास 3 हजार ते 7 हजार रुपयांपर्यंतचा बाजार भाव मिळतोय. मे महिन्यात मोठ्या प्रमाणात हापूस आंबा बाजारात येत असतो. मात्र, यंदा 1 एप्रिल ते 10 मे पर्यंत मोठ्या प्रमाणात हापूस आंबा बाजारात उपलब्ध होणार आहे.



# चेंडूवर लाळ, थुंकी वापरण्यावरची बंदी बीसीसीआयने उठवली?

मुंबई, दि. २० प्रतिनिधी

भारताच्या श्रीमंत टी२० लीग स्पर्धेला २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. २२ मार्चला कोलकाता आणि बंगळुरू या दोन संघांच्या सामन्याने स्पर्धेची सुरूवात होणार आहे. या स्पर्धेची सुरुवात होण्याआधी बीसीसीआयने एक महत्त्वाच्या नियमात बदल केला आहे. आयपीएल मधील सह सर्व १० संघांच्या कर्णधारांची मुंबईत बीसीसीआय मुख्यालयात आज बैठक झाली. या बैठकीत बीसीसीआयने एका नियमाबाबत प्रस्ताव ठेवला आणि यावर अंतिम निर्णय घेण्यात आला. सहसा कर्णधारांची बैठक पहिला सामना ज्या ठिकाणी असतो, तेथे होते. पण यंदा ही बैठक बीसीसीआय कार्यालयात घेतली गेली. त्यामुळे एखादी महत्त्वाची घोषणा होणार याची कल्पना होतीच. त्यानुसार, बीसीसीआयने एक महत्त्वाचा नियम बदलला.

सर्व कर्णधारांची बैठक आज मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात झाली. आयपीएल संघांच्या कर्णधारांव्यतिरिक्त, फ्रँचायझींचे व्यवस्थापक देखील या बैठकीला उपस्थित होते. यंदाच्या हंगामापासून चेंडूची चकाकी कायम ठेवण्यासाठी थुंकी किंवा लाळ लावण्यावरील बंदी उठण्याचा प्रस्ताव सर्व कर्णधारांपुढे ठेवण्यात आला. बोर्डाच्या या प्रस्तावावर बहुतांश कर्णधारांनी होकार दिला. काहींनी आपला निर्णय राखून ठेवला, पण बहुमताने चेंडूला लाळ किंवा थुंकी लावण्यावरील बंदी उठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

### चेंडूवर लाळ, थुंकी वापरण्यावर बंदी का होती?

आयसीसीने कोरोना काळात खबरदारीचा उपाय म्हणून चेंडूला चकाकी आणण्यासाठी वापरात येणाऱ्या लाळेवर बंदी घातली होती. संक्रमणातून पसरण्यात येणाऱ्या कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हा नियम लागू करण्यात आला होता. मात्र आता कोरोनाची भीती जवळपास संपली आहे. त्यामुळे बीसीसीआयने ते 'जुने दिवस' परत आणण्याचा निर्णय घेतला आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com